## वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशासाठीची नीट यूजी परीक्षा आज



**मुंबई :** वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची राष्ट्रीय पात्रता-सह-प्रवेश परीक्षा (नीट यूजी २०२६) रविवार (दि.३) देशभरात घेतली जाणार आहे. महाराष्ट्रातून तब्बल पाच लाखांहून अधिक विद्यार्थी या परीक्षेला बसणार आहेत. नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)मार्फत ही परीक्षा दुपारी २ ते सायंकाळी ५.२० या वेळेत एकाच सत्रात घेतली जाणार आहे. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूरसह राज्यातील ५०हून अधिक शहरांमध्ये परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र, वैध छायाचित्र ओळखपत्र, पासपोर्ट साईज फोटो, पारदर्शक पाण्याची बाटली बंधनकारक आहे, तर धातूच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स, घड्याळ, कागद, नोट्स यांना सक्त मनाई आहे. ड्रेस कोडचे पालन करणे अनिवार्य असून सकाळी ११ वाजल्यापासून केंद्रावर प्रवेश सुरू होईल. दुपारी १.३०नंतर प्रवेश बंद होईल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २८४
www.ramprahar.com

◆ रविवार, ३ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


### अंतरंग


विहिरीत पडलेल्या गाईची सुखरूप सुटका/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचा मालिका विजय/८


## बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर; मुलींची बाजी

# कोकण विभाग राज्यात अव्वल

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावाच्या परीक्षेचा निकाल शनिवारी (दि.२) ऑनलाईन जाहीर झाला. एकूण निकाल ८९.७९ टक्के लागला असून राज्यात कोकण विभाग ९४.१४ टक्क्यांनी अव्वल स्थानावर आहे.

- कोकण : ९४.१४
- पुणे : ९१.२५
- अमरावती : ९०.९२
- नाशिक : ९०.७२
- मुंबई : ९०.०८
- कोल्हापूर : ८९.९७
- छत्रपती संभाजीनगर : ८८.६८
- नागपूर : ८८.६७
- लातूर : ८४.१४
- एकूण : ८९.७९



या परीक्षेस राज्यातील पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमधून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम व आयटीआय या शाखांसाठी एकूण १४,४४,७१३ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४,३३,०५८ विदधार्थी प्रविष्ट झाले, तर १२,८६,८४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण १५३ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

बारावीच्या निकालात पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारल्याचे चित्र आहे. मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी ९३.१५ असून मुलांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८६.८०% आहे. म्हणजेच मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ६.३५%ने जास्त आहे.

दरम्यान, सामुदायिक कॉपी प्रकरणातील ५०१ विद्यार्थ्यांचा निकाल शिक्षण मंडळाने राखीव ठेवला आहे तसेच उत्तरपत्रिका तपासणीत हस्ताक्षर बदल, पान फाडले अशी ४१ प्रकरणे समोर आली. त्या विद्यार्थ्यांचाही निकाल जाहीर करण्यात आला नाही.

> *कॉपीमुक्त अभियान यावेळी चांगल्या पद्धतीने राबवले गेले. त्यामुळे कदाचित निकालात घट झाल्याचे दिसते. त्याचप्रमाणे गेल्या वर्षी एकाही कर्मचाऱ्यावर कारवाई झाली नव्हती, यावेळी १०० जणांवर कारवाई करण्यात आली आहे.*
>
> **-त्रिगुण कुलकर्णी,** *राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष*

## मुंबई विभागात रायगडचा डंका

**अलिबाग : प्रतिनिधी**



बारावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९३.६९ टक्के लागला आहे. जिल्ह्यात श्रीवर्धन तालुक्याचा सर्वाधिक ९७.११ टक्के, तर खालापूर तालुक्याचा सर्वात कमी ८५.०२ टक्के निकाल लागला आहे.

रायगड जिल्ह्यातून बारावीच्या परीक्षेसाठी ३० हजार ५५८ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ३० हजार ४७० विद्यार्थी परीक्षेला सामोरे गेले. यामधील २८ हजार ५४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

यंदादेखील उत्तीर्ण होण्यात मुलींनी बाजी मारली आहे. जिल्ह्यात १५ हजार १२९ मुले परीक्षेला बसली होते. त्यापैकी १३ हजार ८०१ मुले उत्तीर्ण झाली. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९१.२२ टक्के इतके आहे, तर १५ हजार ३४१ मुली परीक्षेला बसल्या होत्या. त्यातील १४ हजार ७४८ मुली उत्तीर्ण झाल्या.

रायगड जिल्ह्याचा विज्ञान शाखेचा निकाल ९८.५७ टक्के, कला शाखेचा ८६.०३ टक्के, वाणिज्य शाखेचा ९१.२९ टक्के, किमान कौशल्य शाखेचा ८९.५९ आणि तंत्रविज्ञान शाखेचा ९२.४० टक्के लागला आहे.

**तालुकानिहाय टक्केवारी**

श्रीवर्धन : ९७.११, तळा : ९६.६९, म्हसळा व कर्जत प्रत्येकी : ९६.३१, अलिबाग : ९५.३९, पनवेल : ९४.७३, रोहा : ९४.२९, पेण : ९३.९४, माणगाव : ९३.५१, उरण : ९३.०३, महाड : ९२.७३ मुरूड : ८८.४६, सुधागड व पोलादपूर प्रत्येकी : ८८.४४, खालापूर : ८५.०२.

## टीएनजी कॉलेजची धवल कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल तालुक्यातील गव्हाण कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सने बारावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेले सर्व ७८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

ज्युनिअर कॉलेजमध्ये वेदिका राजेश म्हात्रे हिने ८३% गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक पटकाविला. राहुल महेश नाईक याने ७१.१७% गुणांसह दुसरा, तर शाहिद खुर्शीद शेख याने ६८.५०% गुणांसह तिसरा क्रमांक मिळविला.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी. गडदे, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षक प्रणिता गोळे, अरुण जोशी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### नसरापूर बालिका बलात्कार व हत्या प्रकरण

## आरोपीला मृत्युदंडाच्या शिक्षेची मागणी करणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

पुण्याच्या भोर तालुक्यातील नसरापूर येथील बालिकेच्या बलात्कार व हत्या प्रकरणाची राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी विशेष सरकारी वकील देऊन आरोपीला मृत्युदंडाच्या शिक्षेची मागणी करणार आहोत, अशी माहिती त्यांनी दिली.



नसरापूर येथे चार वर्षांच्या बालिकेवर ६५ वर्षीय नराधमाने गोठ्यात नेऊन अत्याचार केला. त्यानंतर पुराव्यांची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने बालिकेला दगडाने ठेचून ठार केले आणि तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली गाडून टाकला. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संतप्त पडसाद उमटले. परिसरातील नागरिकांनी पुणे-सातारा महामार्गावर ठिय्या आंदोलन केले. त्यानंतर ग्रामस्थांनी राजगड पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तातडीने तपास करून आरोपीला ताब्यात घेतले. दरम्यान, आरोपीला शनिवारी (दि.२) न्यायालयात हजर केले असता ७ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

या घटनेवर प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे जिल्ह्यातील घटना अत्यंत निंदनीय आणि धक्कादायक घटना आहे. आरोपीला अटक झाली आहे. आरोपीचे अशा प्रकारचे जुने संदर्भही दिसत आहेत. या घटनेतून समाजातून मोठा रोष आहे. सर्वांना या घटनेमुळे पीडित मुलीच्या परिवाराबद्दल प्रचंड हळहळ वाटतेय. आरोपीला अटक केली आहे, मी आश्वस्त करू इच्छितो की, फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरण नेऊ. स्पेशल फास्ट ट्रॅक कोर्ट तयार करायला आम्ही हायकोर्टाला विनंती करू तसेच विशेष सरकारी वकील देऊन आरोपीला मृत्युदंडाची मागणी करणार आहोत.

## मालमत्तेच्या वादातून तिहेरी हत्याकांड

**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे मालमत्तेच्या वादातून एकाच कुटुंबातील आई व तिच्या दोन मुलांची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

गायत्री सुधाकर मस्के (आई), प्रिया सुधाकर मस्के (मुलगी) आणि शिवराज सुधाकर मस्के (मुलगा) अशी मृतांची नावे आहेत. संपत्तीच्या वादातून पप्पू मस्के याने भावजय व तिच्या दोन मुलांवर तलवारीने हल्ला केल्याचा संशय असून पोलीस तपास सुरू आहे.

## चाकणमध्ये चिमुकल्यावर अत्याचार करून निर्घृण खून

**चाकण : प्रतिनिधी**

**आरोपी ताब्यात**

पुणे जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. चाकणच्या म्हाळुंगे दक्षिण पोलीस ठाण्याच्या हद्दीत तीन वर्षांच्या अल्पवयीन चिमुरड्यावर लैंगिक अत्याचार करून त्याची गळा चिरून हत्या केल्याचा प्रकार समोर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मूळचा बिहार येथील रहिवासी असलेल्या अल्पवयीन तरुणाने (वय १६) तीन वर्षीय चिमुकल्यावर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणी दक्षिण महाळुंगे पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. मृत चिमुकल्याचे कुटुंब मूळचे मध्य प्रदेशमधील असून कामनिमित्ताने चाकण परिसरात खालूंब्रे येथे वास्तव्यास होते. खेळायला गेलेला चिमुकला मुलगा बराच वेळ न परतल्याने कुटुंबियांनी शोधाशोध सुरू केली असता आरोपीच्या घरी सुटकेसमध्ये मुलाचा मृतदेह आढळला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## निवडक

### छत्तीसगडमध्ये भूसुरुंग स्फोटात चार जवान शहीद

**रायपूर :** छत्तीसगडमधील कांकेर-नारायणपूर सीमेवर छोटेबेथिया पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या भूसुरुंग स्फोटात चार जवान शहीद झाल्याची घटना शनिवारी (दि.२) सकाळी घडली. कोरोस्कोडा जंगलात शोधमोहिमेदरम्यान नक्षलवाद्यांनी लावलेला आयईडी निकामी करताना अचानक मोठा स्फोट झाला. यामध्ये एका पोलीस निरीक्षकासह तीन जवानांना वीरमरण आले, तर अन्य एक जवान गंभीर जखमी झाला आहे.

### महिला टी-२० वर्ल्डकपसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा

**नवी दिल्ली :** पुढील महिन्यात होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. ही प्रतिष्ठित स्पर्धा इंग्लंडमध्ये १२ जून रोजी सुरू होईल आणि अंतिम सामना ५ जुलै रोजी खेळला जाणार आहे. हरमनप्रीत कौरकडे पुन्हा एकदा भारताच्या संघाचे नेतृत्व देण्यात आले आहे.

## श्रीवर्धनमध्ये भरधाव ट्रेलर पीकअप वाहनावर कोसळला

■ चालकाचा मृत्यू; आठ जण जखमी



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

आंबा तोडणीसाठी मजुरांना घेऊन जाणाऱ्या पीकअप गाडीवर सिमेंटने भरलेला अवजड ट्रेलर उलटल्याने एका मजुराचा जागीच मृत्यू, तर अन्य आठ जण जखमी झाले आहेत. हा अपघात शनिवारी (दि.२) सकाळी ८च्या सुमारास श्रीवर्धन-म्हसळा मार्गावरील बोडणीची डाग घाटात घडला.

मिळालेल्या माहितीनुसार बागमांडला-बाणकोट खाडीवरील पुलाच्या कामासाठी साहित्य घेऊन नवी मुंबई येथून बागमांडला येथे जाणारा ट्रेलर (एमएच-४६ बीबी ४७१२) घाटातून उतरत होता. बोडणीची डाग येथील धोकादायक वळणावर ट्रेलरचालकाचा ताबा सुटला. ट्रेलरने प्रथम एका चारचाकी वाहनाला धडक दिली आणि त्यानंतर आंबा वाहतूक करणाऱ्या महिंद्रा पीकअप (एमएच-०६ जी ९३२०)वर जोरात कोसळला. अपघात इतका भीषण होता की पीकअप वाहन पूर्णतः चिरडले गेले.

या अपघातात पीकअप चालक अजय भालचंद्र जाधव (वय २५, बागमांडला) यांचा जागीच मृत्यू झाला तसेच आठ प्रवासी जखमी झाले असून यापैकी पाच जणांवर श्रीवर्धनमधील रुग्णालयात उपचार सुरू आहेत, तर तिघांना अलिबाग येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. दरम्यान, ट्रेलर रस्त्यावर आडवा झाल्याने काही वेळ वाहतूक खोळंबली होती.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने विविध समाजोपयोगी उपक्रम

**स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार, लोकप्रतिनिधी सत्कार, गुणीजनांचा सन्मान आणि सांस्कृतिक कार्यक्रम**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक, पंचायत समितीचे माजी सभापती, स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्ताने येत्या गुरुवारी (दि.७) सायंकाळी ६ वाजता उलवे नोडमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत.



उलवे नोडमधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर होणाऱ्या या समारंभात विशेषत्वाने पनवेल तालुकास्तरीय स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६चे बक्षीस वितरण तसेच पनवेल-उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार; त्याचबरोबर शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणीजनांचा पारितोषिक सन्मान समारंभ आणि 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, पनवेलचे महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

स्व. जनार्दन भगत यांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले असून त्यांनी अहोरात्र लोकांची सेवा केली. आयुष्यापेक्षा ध्येय मोठे असले पाहिजे ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रूजवत फक्त राजकारण नाही, तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. भगतसाहेबांनी अहोरात्र आपला देह 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या तत्त्वाच्या पूर्ततेसाठी कारणी लावला. तळागाळातील लोकांबद्दल त्यांना विशेष प्रेम होते. दारिद्र्य व भूक यांच्याबद्दल अगदी मनापासून तळमळ होती. तळागाळातील समाजाचा उद्धार फक्त शिक्षणामुळेच होऊ शकतो हे त्यांनी जाणले होते. **(पान २ वर..)**

## कलेमुळे व्यक्त होण्याची संधी मिळते -नगरसेवक परेश ठाकूर

### पनवेलमध्ये रंगला नतनोत्सव







**पनवेल : रामप्रहर वृत्त**


सांस्कृतिक कलेचा वारसा जपणाऱ्या नृत्यार्पण फाईन आर्ट सेंटरच्या वतीने नुकताच नतनोत्सव हा विशेष कार्यक्रम पनवेल शहरातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात मोठ्या थाटामाटात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांना संबोधित करताना नगरसेवक परेश ठाकूर यांनी म्हटले की, कलेमुळे स्वतःला व्यक्त होण्याची संधी मिळते आणि आजच्या धावपळीच्या काळात व्यक्त होणे हे स्वतःचे व्यक्तिमत्व विकसित करण्याचे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे.

"स्वप्नातील प्रत्येक आत्म्याला जोडणारा उत्सव" असे ब्रीदवाक्य घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याने प्रेक्षकांची मने जिंकली. या रंगतदार कार्यक्रमात भारतीय शास्त्रीय नृत्यासोबतच विविध कलाप्रकारांचे सादरीकरण करण्यात आले, ज्यामध्ये संस्थेच्या नवोदित कलाकारांच्या कौशल्याचे दर्शन घडले. नृत्यातून मांडण्यात आलेले विविध भाव आणि लयबद्ध हालचाली हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले.

या कार्यक्रमास नगरसेवक समीर ठाकूर, नगरसेविका राजेश्री वावेकर, दिग्दर्शक जेपी ठकझी, घुंगरू नृत्य महोत्सवाचे क्युरेटर सिंधू नायर, हरिकुमारन मेनन, रमेश अंबालापुझा, भाजप दक्षिण भारतीय सेलचे पुणे शहर सरचिटणीस विजयन नायर, दामोदरन पिल्लई, अनिल प्रकाश, नृत्यार्पण फाईन आर्ट सेंटरच्या फाऊंडर अँड डायरेक्टर नयना प्रकाशन आदी मान्यवर उपस्थित होते.

## मिसिंग लिंकची मुंबई लेनही सुरू



**खालापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनी लोकार्पण झालेल्या मिसिंग लिंकची पुण्याकडून मुंबईकडे जाणारी मार्गिका शनिवारी (दि.२) दुपारी १च्या सुमारास कार व हलक्या वाहनांसाठी खुली करण्यात आली.

सुरक्षेसाठी लावण्यात आलेले बॅरिकेड्स व काही किरकोळ काम प्रलंबित असल्याने शुक्रवारी पुणेहून मुंबईकडे जाणारी मार्गिका खुली करण्यात आली नव्हती, परंतु मुंबई ते पुणे असा प्रवास या नवलाई मार्गावरून वाहनचालकांना करता आला.

पुणे ते मुंबई लेनवर औंढे गावाजवळ किरकोळ काम सुरू होते. ही लेनसुद्धा खुली केल्याने वाहनचालकांचा मुंबई तसेच पुणे असा दोन्ही बाजूकडील मिसिंग लिंकवरील प्रवास सुरू झाला आहे.



## उन्हाळी सुट्टीत पर्यटक मुरूडमध्ये दाखल

**मुरूड : प्रतिनिधी**

समुद्राच्या पाण्यात ठंडा ठंडा कुल कुल होण्यासाठी पर्यटक मुरूडमध्ये उन्हाळी सुट्टी एन्जॉय करण्यासाठी दाखल झाले आहेत. उन्हाचा तडाखा जास्त असल्याने पर्यटक सकाळी आणि संध्याकाळी फिरण्याचा आनंद घेत आहेत.

परीक्षांचे निकाल लागून सुट्ट्या पडल्याने पर्यटकांनी कोकणातील समुद्रकिनाऱ्यांकडे धाव घेतली आहे. जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे पर्यटनप्रेमींना मोठा लाभ झाला असून मुरूड शहरात सायंकाळी छान वातावरण आहे. पर्यटक समुद्रकिनारी असलेल्या वातानुकूलित हॉटेल्सना पहिली पसंती देत आहेत.

सध्या मासळी कमी असल्याने पर्यटक किनाऱ्यावरील नवनवीन चविष्ट पदार्थांच्या स्टॉलवर तसेच पाणीपुरी, भेळपुरी अशा विविध पदार्थांची चव घेत आहेत. मुरूडपासून जवळच असणारा जंजिरा किल्ला विशेष आकर्षण असते. याशिवाय गारंबी धारण, कुडे मांदाड लेणी, खोकरी, दत्त मंदिर या पर्यटनस्थळांवरही स्वच्छता करून खाण्या-पिण्याचे स्टॉल्स लावण्यात आल्याने पर्यटकांची पावले तिकडेही पडत आहेत.

# पावसाळ्यातही येणार उष्णतेची लाट?

## तज्ज्ञांचा इशारा




**मुंबई : प्रतिनिधी**

उत्तर आणि मध्य भारताला सध्या उष्णतेच्या लाटेपासून थोडा दिलासा मिळाला असला तरी, हे संकट अद्याप टळलेले नाही. तज्ज्ञांच्या मते, यंदा केवळ उन्हाळ्यातच नव्हे, तर पावसाळ्यातही सरासरी तापमान उच्च राहण्याची शक्यता आहे. भारताने आगामी काळात उष्णतेच्या लाटांसाठी का सज्ज का राहावे? हवामान खात्याचा इशारा काय? गेल्या आठवडाभरापासून उत्तर आणि मध्य भारताला होरपळून काढणाऱ्या उष्णतेच्या लाटेपासून अखेर नागरिकांना दिलासा मिळाला.

बुधवारी आणि गुरुवारी झालेल्या हलक्या ते मध्यम पावसामुळे हंगामातील पहिल्या उष्णतेच्या लाटेचा प्रभाव ओसरला. भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, पुढील दोन आठवड्यांत पुन्हा उष्णतेची लाट येण्याची शक्यता फारच कमी आहे. मात्र, हा दिलासा तात्पुरताच ठरण्याची शक्यता आहे.

यंदा केवळ उन्हाळ्यातच नव्हे तर पावसाळ्यातही सरासरी तापमान जास्त उच्च पातळीवर राहण्याची शक्यता आहे, त्यामुळे येत्या काही महिन्यांत नागरिकांना आणखीनच उष्णतेच्या लाटांच्या तीव्र झळा सोसाव्या लागू शकतात, असा इशारा हवामान तज्ज्ञांनी दिला आहे, त्याविषयीचा हा आढावा

उष्णतेच्या लाटा नेमक्या कधी येतात? भारतातील बहुतांश भागांत उन्हाळा नेहमीच कडक असतो; परंतु 'उष्णतेची लाट' ही विशिष्ट निकषांवर आधारित स्थिती असल्याचे हवामान तज्ज्ञांनी म्हटले आहे.

एखाद्या ठिकाणचे कमाल तापमान नेहमीपेक्षा किमान पाच अंश सेल्सिअसने जास्त झाले आणि ही स्थिती सलग किमान दोन दिवस टिकली, तर त्या ठिकाणी उष्णतेची लाट असल्याचे घोषित केले जाते. तापमान नेहमीपेक्षा सात अंशांनी जास्त झाल्यास तीव्र उष्णतेची लाट घोषित केली जाते. उष्णतेची लाट जाहीर करण्यापूर्वी इतरही काही घटकांचा विचार केला जातो. यामध्ये ते ठिकाण मैदानात आहे की डोंगराळ भागात, तसेच तिथले सामान्य तापमान 40सेल्सिअसपेक्षा कमी आहे की जास्त, या गोष्टी तपासल्या जातात. मात्र, मुख्य निकष हाच आहे की, जेव्हा एखाद्या ठिकाणच्या तापमानात असामान्य वाढ होते, तेव्हा त्या भागाला उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला जातो. भारतात प्रामुख्याने मार्च ते जून या कालावधीत उष्णतेच्या लाटा येतात, तरीही काही वेळा त्यांचा विस्तार मान्सूनच्या हंगामापर्यंतही होतो. 2023 मध्ये देशाच्या काही भागांत फेब्रुवारी महिन्यातच उष्णतेच्या लाटेसारखी स्थिती निर्माण झाली होती. प्रत्यक्षात मात्र फेब्रुवारी महिन्यात उष्णतेची लाट घोषित करण्याची कोणतीही तरतूद नियमावलीत नाही.

उष्णतेच्या लाटा कशामुळे तयार होतात? भारतात उष्णतेच्या लाटा प्रामुख्याने दोन भागांत पाहायला मिळतात. पहिला भाग हा उत्तर-पश्चिम आणि मध्य भारतात येतो, जो बिहार व झारखंडपर्यंत पसरलेला असून उष्णतेचा मुख्य पट्टा म्हणून ओळखला जातो. दुसरा भाग पूर्व किनारपट्टी परिसरात येतो आणि त्यामध्ये आंध्र प्रदेश आणि ओडिशा या राज्यांचा समावेश होतो. या दोन्ही क्षेत्रांत उष्णतेची लाट निर्माण होण्यामागची भौतिक कारणे वेगवेगळी असली तरी ती एकमेकांशी संबंधित आहेत.

वातावरणाच्या वरच्या थरात निर्माण होणारी उच्च दाबाची स्थिती हे उत्तर आणि मध्य भारतातील मुख्य पट्ट्यात उष्णतेच्या लाटा येण्याचे मुख्य कारण मानले जाते. या प्रक्रियेमुळे हवा जमिनीच्या दिशेने खाली दाबली जाते आणि तिचे संकुचन झाल्याने तापमान लक्षणीयरीत्या वाढते. दुसरीकडे, आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या किनारपट्टीवर वेगळी स्थिती असते.

# आडाचीवाडीत विहिरीत पडलेल्या गाईची ग्रामस्थांकडून सुखरूप सुटका

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भागातील महालगुर आडाचीवाडी येथे एका गाईला विहिरीवर टाकलेल्या हिरव्या रंगाच्या जाळ्यात आंबा पडल्याचे दिसताच गाईने उडी मारली आणि हिरव्या जाळ्यासह गाय ५० फूट खोल विहिरीत पडली. मात्र ग्रामस्थांनी या गाईला विहिरीतून सुखरूपपणे बाहेर काढले.



आडाचीवाडी येथील विहिरी जवळ पाण्याची तहान लागल्याने गाय आली असता विहिरीवर पिण्याच्या पाण्यामध्ये कचरा पडू नये, यासाठी हिरव्या रंगाच्या जाळीने विहिर झाकण्यात आली होती. या हिरव्या कापडी जाळीवर झाडावर आंबा पडल्याने गाईला मोह आवरता आला नाही आणि जाळीवर पडलेला आंबा खाण्यासाठी गाईने उडी घेतली आणि गाय सुमारे ५० फूट खोल विहिरीत कोसळली. शनिवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास विहिरीत पडलेल्या गाईला बाहेर काढण्यासाठी ग्रामस्थांनी कंबर कसली. ग्रामस्थांनी आपसात समन्वयाने दोरीच्या साह्याने अथक प्रयत्नानंतर गाईला बाहेर काढले.

आडाचीवाडी येथील शेतकरी कुटुंबातील माजी सरपंच विलास बाबू उतेकर यांच्या मालकीची गाय सकाळी गावाशेजारी विहिरीजवळ पाण्यासाठी विहिरीजवळ आली. सुदैवाने विहिरीत पाणी असल्याने गाय तरंगत राहिल्याने बचावली.

# चौल सोंडेपार येथे कोल्हाई देवी मंदिर जीर्णोध्दार सोहळा उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल सोंडेपार येथे कोल्हाई देवी मंदिर जीर्णोध्दार सोहळा नुकताच संपन्न झाला. चौल सोंडेपार ग्रामस्थांचे मागणीने आमदार महेंद्र दळवी यांचे निधीतून व नवनिर्वाचीत जि.प.सदस्य डॉ. सचिन राउळ यांच्या प्रयत्नाने कोल्हाई देवी-उताणी देवी मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला आहे.



२९ एप्रिल रोजी सायकांळी सहा वाजता कोल्हाई देवी-उताणी देवी मंदिराचे जीर्णोध्दार सोहळा कार्यक्रमाचे नियोजन सोंडेपार ग्रामस्थांचे वतीने करण्यात आले होते. यानिमित्त जिल्हा परिषद सदस्य दिलिप भोईर उर्फ छोटम शेठ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, तर जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ, चौल पंचायत समिती गण सदस्या अंकिता घरत, रेवदंडा पंचायत समिती गण सदस्य शरद गोंधळी यांचेसह प्रविण राउत, चौल शिवसेना पंचायत समिती विभाग प्रमुख प्रशांत शेवणईकर, सिध्देश शेवणईकर, महेंद्र घरत, सुदेश राउळ, अलिबाग मुरूड विधानसभा मतदार संघ संघटिका तनुजा मोरे-घरत, रेवदंडा महिला आघाडी प्रमुख शलाका राउत, चौल महिला आघाडी ज्योती मुंबईकर, वृंदा ठाकूर, विशाल ठाकूर, आदी मान्यवर मंडळीसह सोंडेपार ग्रामस्थ व महिला यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पंचायत समिती सदस्या अंकिता घरत यांचे हस्ते पुजाअर्चा करण्यात आली. त्यानंतर मंदिर जीर्णोध्दार नामफलकाचे अनावरण जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राउळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर सोंडेपार ग्रामस्थांचे वतीने मान्यवर उपस्थित जि.प.सदस्य डॉ.सचिन राउळ, पंचायत समिती सदस्या अंकिता घरत, पंचायत समिती सदस्य शरद गोंधळी,प्रविण राउत, महेंद्र घरत, तनुजा मोरे-घरत,शलाका राउत, ज्योती मुंबईकर आदीचे शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ प्रदान करून स्वागत करण्यात आले.

जि.प. सदस्य दिलीप भोईर यांनी कोल्हाई देवीची पुजाअर्चा केली. ग्रामस्थ अध्यक्ष निलेश ठाकूर, विशाल ठाकूर, वृंदा ठाकूर, विपुल ठाकूर, दिनेश म्हात्रे, संदेश मळेकर, शुभम मळेकर आर्दीनी विशेष परिश्रम घेतले.



**डोंबिवली : येथील संजय घरत यांची सुकन्या शांभवी हिने बारावी बोर्डाच्या परीक्षेत ९७% गुण मिळवून उत्तुंग यश संपादन केले आहे. यावेळी त्यांच्या निवासस्थानी भाज प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सदिच्छा भेट देत शांभवीचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# श्री स्वामी समर्थ नगरमध्ये रंगला भक्तीसंध्या कार्यक्रम

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील श्री स्वामी समर्थ नगरामध्ये श्रीसत्यनारायणाच्या महापूजे निमित्ताने भक्तीसंध्या या कार्यक्रमात डॉ. संतोष झापकर यांनी सुस्वर आवाजात भक्तीगीते व अभंग म्हटले. यावेळी उपस्थित भक्तगण व श्रोते त्यांच्या गाण्याच्या आवाजात मंत्रमुग्ध झाल्याचे पाहावयास मिळाले.

श्रीसत्यनारायण महापूजेच्या दर्शनासाठी व भक्तीमय शास्त्रीय संगीताला मोठ्या प्रमाणात भक्तगण व नागरिकांची उपस्थिती लाभली होती. या परिसरात सर्वत्र भक्तीमय असे वातावरण निर्माण झाल्याचे पाहावयास मिळाले.

रात्री श्री स्वामी समर्थ नगरातील महिला व बालकांनी आनंदाने फनी गेम व विविध स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धामधे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावलेल्या स्पर्धकांना मान्यवरांचे हस्ते पारितोषिक देण्यात आले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वामी समर्थ नगरातील ग्रामस्थ व महिलांनी प्रयत्न केले.



# वनमंत्री गणेश नाईक यांनी स्वजनगणना करीत नागरिकांनाही केले स्वजनगणना करण्याचे आवाहन

## महापौर सुजाता पाटील, आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्याकडून सहभागी होण्याचे आवाहन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या भारत देशाच्या सर्वांगीण विकासाचे नियोजन करण्यासाठी जनगणना २०२७ अतिशय महत्वाची असून मी स्वतः ऑनलाईन स्व जनगणना केली असून जनगणनेसाठी आवश्यक माहिती ऑनलाईन भरलेली आहे, असे सांगत महाराष्ट्र राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी स्वतः स्वतःची माहिती भरली तर ती अचूक राहते, त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्याला उपलब्ध करून दिलेला स्वजनगणना संधीचा लाभ घ्यावा आणि या राष्ट्रीय कार्यात स्वयंस्फुर्तीने पुढे यावे, असे नागरिकांना आवाहन केले.



महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ऑनलाईन जनगणनेच्या पहिल्या टप्प्यास १ मेपासून सुरूवात झाली असून वनमंत्री गणेश नाईक यांनी स्वजनगणना करीत घराची स्थिती, कुटुंबाची माहिती, कुटुंबास उपलब्ध असलेल्या सोयी, कुटुंबाकडे असलेल्या सुविधा विषयक ३३ साध्या सोप्या प्रश्नांची ऑनलाईन माहिती भरून स्वजनगणना केली. याप्रसंगी महापौर सुजाता पाटील व शहर जनगणना अधिकारी, उपायुक्त संजय शिंदे उपस्थित होते.जनगणनेच्या पहिला टप्पा १ मे ते १५ मे या कालावधीत संपन्न होत असून या कालावधीत नागरिक https://se.census.gov.in या जनगणनेच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपली स्वतःची माहिती ऑनलाईन भरू शकतात व महत्वाचे म्हणजे या माहितीचा उपयोग जनगणनेव्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी केला जाणार नाही. ही माहिती पूर्णतः गोपनीय आहे हे स्पष्ट करीत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांनी मी स्वजनगणना केली असून, सर्व नवी मुंबईकर नागरिकांनी देशाच्या, राज्याच्या तसेच शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेली जनगणना स्वतः पुढाकार घेऊन स्व जनगणनेच्या उपलब्ध असलेल्या पर्यायाव्दारे करून घ्यावी, असे आवाहन केले आहे.

दरम्यान, महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनीही जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यात नागरिकांना उपलब्ध करून दिलेल्या स्वजनगणनेच्या पर्यायाचा उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## पान १ वरुन

# थोर समाजसुधारक स्व.जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने विविध समाजोपयोगी उपक्रम

आपली दूरदृष्टी, अविश्रांत श्रम, चिकाटी, धडाडी त्याचबरोबर व्यापक समाजहिताची तळमळ ही उदात्त भावना भगतसाहेबांच्या अंतःकरणात कायम होती. त्याचबरोबर देवदूताची भूमिकासुद्धा पार पाडत त्यांनी समाजाला न्याय दिला आहे. त्यामुळे भगतसाहेबांची किर्ती अजरामर राहिली आहे.

भगतसाहेबांची जयंती फेब्रुवारी लीप महिन्यामुळे दर चार वर्षांनी असते. त्यावेळी राज्यात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीला त्यांच्या नावे बहुमानाचा पुरस्कार दिला जातो, तर दरवर्षी पुण्यतिथीलाही सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करत त्यांच्या स्मृतीला अभिवादन करत युवा पिढीला प्रेरणा देण्याचे काम केले जाते. त्या अनुषंगाने या कार्यक्रमाचे अनन्यसाधारण महत्त्व असून नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांनी केले आहे.

# खासदार सुनील तटकरेंच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, वासांबे विभागाच्या वतीने आयोजित एका भव्य सोहळ्यात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते विविध जनहितार्थ विकासकामांचे लोकार्पण करण्यात आले. हा सोहळा मोहोपाडा येथील जनता विद्यालय परिसरात मोठ्या उत्साहात पार पडला.



शिक्षण क्षेत्रातील प्रगतीचा विचार करून खासदार तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा येथील जनता विद्यालयात संगणक, प्रिंटर आणि इंटरॅक्टिव्ह पॅनल बसविण्यात आले आहेत. या सुविधेमुळे स्थानिक विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शिक्षण मिळण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरांप्रमाणेच डिजिटल शिक्षणाची दारे खुली झाल्याने पालक व शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या पदाधिकारी नियुक्ती करुन त्यांना खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते निवडपत्र देण्यात आले. तसेच ग्रुप ग्रामपंचायत वासांबे अंतर्गत सौर ऊर्जेचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला आहे.

या योजनेंतर्गत गावातील मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये सोलर पथदिवे आणि हायमॅक्स दिवे बसविण्यात आले आहेत. यामुळे गावाचा परिसर उजळून निघाला असून ग्रामस्थांची सुरक्षितता आणि सोय वाढली आहे.

या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी सरपंच उमाताई मुंढे,माजी सरपंच संदीप मुंढे, ग्रामसुधार मंडळाचे पदाधिकारी सुधाकर घारे,जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, अंकीत साखरे आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वरिष्ठ पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खालापूर तालुका सचिवपदी नामदेव कोकंबे,रसायनी विभागीय अध्यक्षपदी हरेश उतेकर आदींची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वासांबे विभागाच्या वतीने जंगी तयारी करण्यात आली होती.

# फुंडे येथील वाजेकर विद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण

**उरण : बातमीदार**

फुंडे येथील तुकाराम हरि वाजेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त उत्साहात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर किशोर पाटील यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे महत्त्व स्पष्ट करून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. प्राचार्य बबन साळुंखे यांनी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राचा गौरव वाढवण्यासाठी आपले योगदान द्यावे, असे आवाहन केले. तसेच जनगणना मोहिमेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी व पालकांनी स्व-गणना करण्याचेही आवाहन त्यांनी केले.पालक प्रतिनिधी यांनी कामगार दिनानिमित्त उपस्थितींना कामगार दिनाचे महत्व सांगितले.

कार्यक्रमादरम्यान महेश पाटील यांनी उपस्थितांना शपथ दिली. तसेच परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरेश पाटील यांनी केले.विद्यालयातील इयत्ता ७ वीच्या वर्गातील मुलींनी राष्ट्रगीत ध्वजगीत व राज्यगीत गायन केले.त्यास पी. ए.पाटील यांनी तबल्याची साथ दिली.

कार्यक्रमास उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, पर्यवेक्षिका सुप्रिया पाटील, ज्युनिअर विभागप्रमुख बाबुराव पाटोळे, झुंझार माने, माध्यमिक विभागाचे सदानंद म्हात्रे, कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# सीकेटी ज्युनिअर कॉलेजचा बारावीचा निकाल ९८.५५ टक्के

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी (फेब्रु/मार्च २०२६) बोर्ड परीक्षेचा एकूण निकाल ९८.५५ टक्के लागला आहे. कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतून बोर्ड परीक्षेस एकूण १२४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यातून १२३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.


दिशा नानाजी बोरसे (कला विभाग) प्रथम : 97.50%


श्रावणी निलेश गावंड (वाणिज्य विभाग) प्रथम : 88.50%


हंसिका जितेश कलाल (विज्ञान विभाग) प्रथम : 85.50%

कला शाखेचा निकाल ९७.६४ टक्के लागला असून कला शाखेतून ८५ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यातून ८३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कला शाखेतून दिशा नानाजी बोरसे ही विद्यार्थिनी ७९.५० टक्के गुण मिळवून प्रथम, सृष्टी संतोष महाडिक ही विद्यार्थिनी ७७.८३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर विशेष म्हणजे रोशनी जगदीशभाई कुमावत या दृष्टीहीन विद्यार्थिनीने ७७.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ९७.०२ टक्के लागला असून वाणिज्य शाखेतून ४०४ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यातून ३९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेतून श्रावणी निलेश गावंड ही विद्यार्थिनी ८८.५० टक्के गुण मिळवून प्रथम, सचिनकुमार बसंतलाल कुशवाहा हा विद्यार्थी ८८.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय, तर आर्या राकेश खंडागळे या विद्यार्थिनीने ८६.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विज्ञान शाखेचा निकाल ९९.४७ टक्के लागला असून विज्ञान शाखेतून ७५९ विद्यार्थी बोर्ड परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यातून ७५५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेतून हंसिका जितेश कलाल ही विद्यार्थीनी ८५.५० टक्के गुण मिळवून प्रथम, निखिल मंटूप्रसाद गुप्ता हा विद्यार्थी ८५.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर शुभम संतोष सडेकर या विद्यार्थ्याने ८५.०० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.

एचएससी बोर्ड परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी गुणवंतांचे अभिनंदन केले तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या आहेत.

## पनवेलमध्ये आज हिंदू संमेलन

# सकल हिंदू समाज, संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रभक्तीचा संगम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सकल हिंदू समाज, साईनगर/किनारा वस्ती तसेच पायोनियर वस्ती, पनवेल यांच्या वतीने ३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता साईनगर सोसायटीच्या मैदानावर सकल हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हिंदू संस्कृतीचे जतन, परंपरेचा अभिमान व समाजातील एकात्मता दृढ करण्याच्या उद्देशाने हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. यात हिंदुत्व, संस्कृती, राष्ट्रभक्ती, सामाजिक एकतेचा संदेश दिला जाणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून मनोज शंभू सिंह, रुपाली जोशी व विवेक भागवत उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. विविध ढोलताशा पथकांनी महाराष्ट्राची समृद्ध परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी सन्मान करण्यात येणार आहे. शिवकालीन शस्त्रप्रदर्शन, शिवशस्त्र गाथा, युद्धकला प्रात्यक्षिके यांसारखी आकर्षणे नागरिकांसाठी आहेत. हिंदू संस्कृती व ऐतिहासिक वारसा' विषयावर बाल वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने संमेलनात सहभागी व्हावे तसेच आपल्या पथकांसह सन्मान स्वीकारावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.





**पनवेल : महानगरपालिका प्रभाग क्र. ९ अंतर्गत टेंभोडे गावाच्या स्टॉपपासून गावच्या आतपर्यंतच्या डांबरीकरण कामाचे उद्घाटन नुकतेच पार पडले. यावेळी भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य अरुणशेठ भगत, नगरसेविका ॲड. प्रतिभा सुभाष भोईर, नगरसेवक महादेव मधे, शशिकांत शेळके, दमयंती निलेश भोईर, सुभाष भोईर, मोहन गाडगे, संतोष भोईर, प्रकाश गाडगे, महेंद्र गाडगे, लक्ष्मण गाडगे, ललित अर्जुन भोईर, कु. यश भोईर, श्रावण म्हसकर, काकेश पाटील, महेश भोईर, प्रकाश गायकवाड, गणेश पाटील, आदित्य भोईर, वैष्णव भोईर आदी उपस्थित होते.**

## निवडक

### मारहाणप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** आसुडगावजवळ कार बसला आडवी लावून चालकाला शिवीगाळ आणि मारहाण केल्याप्रकरणी तीन अनोळखी इसमांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात ३० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अविनाश वाडेकर हे एसटी महामंडळात चालक म्हणून काम करतात. ३० एप्रिल रोजी बोरिवली डेपोतून बस घेऊन ते पुण्यासाठी निघाले. पनवेल रोडवर कळंबोली ब्रिजच्या पुढे आसुडगाव येथील पेट्रोल पंपाजवळ समोर आले असता पांढऱ्या रंगाची ब्रिजाकार क्रमांक एम एच ४८ डीडी ५८८७ वरील चालकाने त्याची कार बसच्या पुढे आणून आडवी लावली. त्यानंतर कारमधील तीन इसम खाली उतरले आणि चालकाच्या केबिनमध्ये येऊन माझ्या गाडीला ठोकले तसेच वाद घालून शिवीगाळ व मारहाण केली. यावेळी वाहकाने चित्रीकरण केले असता तिन्ही व्यक्तींनी त्यालादेखील मारहाण केली.

### हातावर मारून मोबाईलची चोरी

**नवीन पनवेल :** रेल्वेने प्रवास करताना अनोळखी इसमाने हातावर फटका मारून मोबाईल खाली पडल्यानंतर तो उचलून चोरून नेला. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे ३० एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परेश सुरेश गोळे (वय १९, रा. सद्गुरु नगर, दिवा) हा २७ एप्रिल रोजी रोहा येथे जाण्यासाठी दिवा स्टेशन येथे रत्नागिरी पॅसेंजर गाडीच्या इंजिनच्या बाजूकडील तिसऱ्या डब्यात दरवाजात बसून प्रवास करत होता. पनवेल रेल्वे स्टेशन येथून गाडी सुटल्यानंतर सायंकाळी सातच्या सुमारास एका अनोळखी इसमाने ट्रेन उसरली गावाजवळ आली असता काठीने त्याच्या हातावर फटका मारला व तो फोन उचलून अनोळखी इसम घेऊन गेला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती रथयात्रा व लेझीम स्पर्धा

# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठेचे घवघवीत यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

१४ एप्रिल २०२६ रोजी महान समाजसुधारक भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्त पनवेल महानगरपालिकेद्वारे आयोजित लेझीम व रथयात्रा स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे लेझीम पथकाने उत्कृष्ट सादरीकरण करून दुसरा क्रमांक पटकावला आहे. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनपटावर आधारित रथयात्रेत आकर्षक सादरीकरणामुळे शाळेला तिसरा क्रमांक प्राप्त झाला आहे.



या यशामुळे शाळेच्या उल्लेखनीय कामगिरीत मानाचा तुरा खोवला गेला आहे. या यशाचे मानकरी अर्थातच विद्यार्थी, त्यांचे मार्गदर्शक शिक्षक व शाळेचे मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांचे नेतृत्वदेखील स्पष्टपणे दिसून आले. विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत, शिस्त आणि सातत्यपूर्ण सरावामुळेच त्यांना हे यश प्राप्त झाले आहे. लेझीम पथकातील इयत्ता सहावी ते आठवीचे विद्यार्थी यांनी आपल्या जोशपूर्ण आणि समन्वयपूर्ण सादरीकरणामुळे शोभायात्रेतील सर्वांचे लक्ष आकर्षित केले. तसेच इयत्ता चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य आणि सांघिक कार्याची उत्कृष्ट झलक दाखवली. यामध्ये विद्यार्थ्यांनी भारतीय संविधान निर्मिती, हक्क आणि कर्तव्य यावर आधारित एक प्रभावी भूमिकानाट्य सादर केले.

या सादरीकरणात संविधानाची प्रस्तावना प्रभावीपणे सादर करण्यात आली. जनतेला समानता, स्वतंत्र, बंधुता आणि न्याय याचे महत्त्व व संदेश या सादरीकरणातून देण्यात आला. या यशाबद्दल शाळेचे सर्वेसर्वा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य यांनी शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी, शाळेच्या पर्यवेक्षिका शुभांगी ठाकूर, शमिका कुलकर्णी, मार्गदर्शक शिक्षक, विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन करीत त्यांना शुभेच्छाही दिल्या. शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी यांनीदेखील विद्यार्थ्यांचे कौतुक करीत या यशामुळे शाळेचे नाव निश्चितच उंचावले आहे, अशी ग्वाही दिली. या यशाबद्दल सन्मान म्हणून महाराष्ट्र दिनानिमित्त पनवेल महानगरपालिकेकडून पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# गव्हाण विद्यालयाने राखली उज्ज्वल यशाची परंपरा | बारावीचा निकाल ९४.४०%, वाणिज्य शाखा १००%, तर कला शाखा ९२.३०%

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी - २०२६ मध्ये संपन्न झालेल्या एच.एस.सी.अर्थात इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचा निकाल ९४.४० % तर वाणिज्य शाखेचा निकाल १००% लागला.विद्यालयामधील कला व वाणिज्य या दोन्ही शाखेत मिळून १४३ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. बोर्ड परीक्षेस नामनिर्देशनपत्र भरलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी १३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर ८ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. मात्र वाणिज्य शाखेच्या शंभर टक्के निकालाची परंपरा विद्यालयाने कायम राखली असून वाणिज्य शाखेतून एकूण ३९ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ठ झोले व सर्वजण उत्तीर्ण झाले. कला शाखेतून परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या १०४ विद्यार्थ्यांपैकी ९६ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन कला शाखेचा निकाल ९२.३०% लागला. विद्यालय आणि वाणिज्य शाखेतील प्रथम तीन क्रमांक :-*वाणिज्य शाखेच्या कु. सानिका सुधीर ठाकूर हिने ४८४ (८०.६७%) गुण प्राप्त करून विद्यालयामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला, तर कु. दक्षता अशोक पाटील हिने ४४९ (७४.८३%) गुण प्राप्त करून विद्यालयामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला असून कु. क्षृंखला सतीश घरत हिने ४७१ (७३.५ %) गुणांसह विद्यालयामध्ये तृतीय क्रमांक प्राप्त केला. विद्यालयाच्या प्रथम तिन्ही विद्यार्थीनी ह्या वाणिज्य शाखेतील आहेत. कला शाखेतील प्रथम तीन क्रमांक :-* प्रथम : कु., रोशनी हरिभाऊ जोंधळे, गुण ४२७ (७१.१७ %), द्वितीय : गडकरी श्रवण श्रीकांत, ३९६ गुण (६६ %), तृतीय : भगत प्रिन्स शरद ३८४, (६४%). विद्यालयाच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखणाऱ्या या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, ज्युनिअर कॉलेज स्थानिक शाळा समितीचे सदस्य तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी.देशमुख,विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्युनिअर कॉलेज विभाग स्थानिक शाळा समितीचे सदस्य ॲड.राहुल घरत, विजयशेठ घरत,विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर,उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील,रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. तसेच ज्युनिअर कॉलेजला अध्यापन करणारे संजय उगले यांचेसह राजेंद्र चौधरी,माणिक घरत, अर्चना पाटील, करुणा तांडेल, जयराम सोनटक्के व विठ्ठलसिंग पाटील यांचीही सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महाराष्ट्र आणि कामगार दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शुक्रवार १ मे रोजी सकाळी ८ वाजता जिमखाना समितीच्या वतीने महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात आणि थाटात साजरा करण्यात आला. या विशेष प्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य संजय भगत, प्रभाकर जोशी, अनिल खोपडे, दीपक शिंदे आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.



सदर कार्यक्रमाची सुरुवात सकाळी लवकर ध्वजारोहणाने झाली. राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीताने वातावरण देशभक्तीने भारावून गेले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा इतिहास, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान आणि राज्याच्या विकास प्रवासावर सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मराठी भाषेविषयी लघुनाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विशेषतः महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवणाऱ्या लोकनृत्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका निशा नायर दोन्ही महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमांमध्ये दोन्ही महाविद्यालयांच्या वतीने रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्राध्यापक समाधान बेहेरे यांनी आंतरराष्ट्रीय कामगार दिन व महाराष्ट्र दिन तसेच बुद्धपौर्णिमा याविषयी अनमोल विचार व्यक्त केले. जिमखाना समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणात समाजातील एकोपा आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव कायम ठेवण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र दिन आपल्याला आपल्या अस्मितेची जाणीव करून देतो, तर कामगार दिन आपल्याला कष्टकऱ्यांच्या योगदानाची कदर करण्याची शिकवण देतो.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. उपस्थितांसाठी उत्तम अल्पोपहाराचीही व्यवस्था होती. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शेवटी प्रा. नीलम मोरे यांनी सर्व मान्यवर, सहभागी विद्यार्थी यांचे आभार मानले. अशा उपक्रमामुळे समाजात सामाजिक बांधिलकीची भावना दृढ झाली असून भविष्यातही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, अशी ग्वाही यावेळी देण्यात आली.

# कामगार दिनानिमित्त लोकनेते दि.बा. पाटील विद्यालय कामोठे येथे अनोखा उपक्रम

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे लोकनेते दि.बा. विद्यालय कामोठेत कामगार दिन व महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या स्थानिक सल्लागार समितीचे चेअरमन व स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य जयदास गोवारी, माजी चेअरमन, शिक्षणप्रेमी स्वामी अप्पा म्हात्रे, विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी मोहन कोंगरे यांनी कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यालयातील पुढील वर्षांमध्ये सेवानिवृत्त होणारे चतुर्थश्रेणी कर्मचारी राजेंद्र मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याचे ठरविले.

विद्यालयातील ध्वजारोहण मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील NMMS व RTS शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा स्कूल कमिटीमार्फत फुलपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक गावंड, लेखनिक गोवारी सर व सर्व सेवकवृंद उपस्थित होते.



# टॅलेंट-ओ स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या शिक्षक समूहाचा उत्कृष्ट कामगिरी करीत प्रथम क्रमांक

**खारघर : रामप्रहर वृत्त**

स्व. जनार्दन भगत साहेब यांच्या जयंतीनिमित्त जे. बी. एस. पी. संस्थेचे रामशेठ ठाकूर सेकंडरी अँड हायर सेकंडरी विद्यालय खारघर-ओवे पेठ येथे दिनांक २ मे २०२६ रोजी "टॅलेंट-ओ" स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत



शिक्षक समूहाने मोठ्या उत्साहात सहभाग घेत आपली संघभावना सादर केली.

संदीप राऊत, मधुकर धोंगडे, ऋता, भामरे, अंजल काला, अथिरा मॅडम त्यांच्या उत्कृष्ट टीमवर्कची दखल घेत विजेत्यांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल शिक्षक समूहाला गौरविण्यात आले.

यशस्वी शिक्षक समूहाचे प्रथम क्रमांक आल्याबद्दल संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी मॅडम यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

शाळेच्या वतीने सर्व सहभागी शिक्षक समूहाचे कौतुक करण्यात आले तसेच त्यांच्या मेहनतीचे आणि समर्पणाचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शिक्षकवर्ग व कर्मचाऱ्यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# मराठी चित्रपटांसाठीचे पुरस्कारही वैशिष्ट्यपूर्ण

झूम प्रहर
दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक



चित्रपट संस्कृतीतील एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट, पुरस्कार. असे पुरस्कार म्हणजे आपण केलेल्या कामाची विशेष दखल आणि यापुढेही अधिक चांगले काम करावे याची दिली जात असलेली जाणीव.


अनेक गोष्टींसाठी आज पुरस्कार दिले/घेतले जाताहेत. त्याने प्रोत्साहन मिळते, 'मीच पुरस्कार पटकावला' असा काहींचा इगोही सुखावतो, 'मला नामांकन होते' अशी प्रोफाईलमध्ये नोंद वाढते. तेदेखील खूप महत्त्वाचे असते. माणसं तेवढी वृत्ती/प्रवृत्ती हा अलिखित नियम अभिनय क्षेत्रांतही लागू पडतो.

अनेक पुरस्कारांमधील एक बालकलाकाराचा पुरस्कार. तोही खूप महत्त्वाचा, आत्मविश्वास वाढवणारा आणि त्याच्या काही मोजक्या खास आठवणी सांगतो.


तुम्हालाही माहित्येय, सचिन पिळगावकर आणि महेश कोठारे यांनी साठच्या दशकाच्या सुरुवातीला बालकलाकार म्हणून कारकीर्द सुरू केली. विशेष म्हणजे लागोपाठच्या वर्षी या दोघांना महाराष्ट्र राज्य सरकारच्या वतीने सर्वोत्कृष्ट बालकलाकार म्हणून अभिनयाचा पुरस्कार प्राप्त झाला. १९६३-६४ साली सचिन पिळगावकरला सुधीर फडके निर्मित आणि राजा परांजपे दिग्दर्शित 'हा माझा मार्ग एकला'साठी तर १९६४-६५ साली महेश कोठारेला राम गबाले दिग्दर्शित 'छोटा जवान'साठी मिळाला. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर १९६२ साली राज्य शासनाकडून हा चित्रपट पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येऊ लागले, पण पहिल्या सोहळ्यात बालकलाकाराचा पुरस्कार नव्हता, मात्र 'हा माझा मार्ग एकला' या चित्रपटातील बालकलाकार सचिन पिळगावकरच्या कामाचे सर्वत्र विशेष कौतुक झाल्याने हा पुरस्कार सुरू करण्यात आला. आपल्या पहिल्याच चित्रपटात अभिनयाचा पुरस्कार पटकावण्यात हे दोघेही यशस्वी ठरले.

ही खास गोष्ट अथवा स्टोरी इतक्यावरच थांबत नाही... महेश कोठारेने वयात आल्यावर नायक/निर्माता/दिग्दर्शक/वितरक अशी चौफेर धूमधडाका करत 'धडाकेबाज' वाटचाल सुरू केली आणि त्याच 'झपाटलेला' वाटचालीत एक चित्रपट होता, माझा छकुला ( १९९४). त्यात महेश कोठारेचा मुलगा आदिनाथ कोठारे बालकलाकार होता आणि आदिनाथला सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा राज्य शासनाकडून पुरस्कार प्राप्त झाला. एक छान योगायोग म्हणता येईल.

असाच आणखी एक छान योगायोग घडला. सचिन पिळगावकर दिग्दर्शित 'एकुलती एक' (२०१३) या चित्रपटाव्दारे श्रिया पिळगावकरने अभिनय क्षेत्रात पाऊल टाकताच आपल्या या पहिल्याच चित्रपटातील अभिनयासाठी 'सर्वोत्कृष्ट नवतारका' हा राज्य चित्रपट महोत्सवात पुरस्कार पटकावला. म्हणजेच, पिता आणि पुत्र यांनी आपल्या पहिल्याच चित्रपटात अभिनयात राज्य चित्रपट पुरस्कार प्राप्त झालाय. अशा योगायोगाच्या गोष्टी जशा रंजक आहेत, तशाच त्या विजेत्यांचा आत्मविश्वास वाढवणाऱ्या आहेत.




बालकलाकाराला पुरस्कार या गोष्टीत आणखी एक रंग. जेव्हा पहिल्यांदाच आपला मराठी चित्रपट ऑस्करसाठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून पाठवला गेला होता, तेव्हाची आठवण सांगायलाच हवी. कथी आर्ट्स निर्मित आणि संदीप सावंत दिग्दर्शित 'श्वास' (२००३) या चित्रपटाची तशी निवड झाली रे झाली आणि मराठी सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य, माध्यम, राजकीय क्षेत्रात अबब... म्हणावी अशी प्रचंड सकारात्मक प्रतिक्रिया उमटली. उर्जा निर्माण झाली. याच 'श्वास'मधील बालकलाकार अश्विन चितळे याची तेव्हाची एक प्रतिक्रिया अगदीच वेगळी होती हो. वयानुसार माणसाच्या प्रतिक्रिया असतात अथवा हव्यात आणि हा अलिखित नियम कलाकारांनाही लागू होतोच की. तीही माणसेच. हाडामासाची, विविध भावभावनांची. चेहरा रंगवल्यावर ते कलाकार असतात आणि कलाकार जेव्हा माणूस म्हणून वावरतो तेव्हा काही काही प्रतिक्रिया भाबड्या वाटल्या तरी त्या संयुक्तिक असतात. त्या त्या वयानुसार असतात.






ऑस्करसाठी 'श्वास' पाठवला जाण्याच्या काही दिवस अगोदर या चित्रपटाला भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांत सुवर्ण पदकाचा मान प्राप्त झाला तेव्हाची गोष्ट. अत्रे पिक्चर्स निर्मित आणि आचार्य अत्रे दिग्दर्शित १९५४ सालच्या 'श्यामची आई' या चित्रपटानंतर असे घडत होते हे विशेषच होते. ('श्यामची आई' या चित्रपटाच्या वेळी राष्ट्रीय चित्रपट पुरस्काराचे ते पहिलेच वर्ष होते हे आवर्जून सांगायलाच पाहिजे.) 'श्वास' असा दोनदा (ऑस्कर आणि राष्ट्रपती पुरस्कार) वृत्तपत्राची हेडलाईन आणि न्यूज चॅनेलची ब्रेकिंग न्यूज होती. नेहमीप्रमाणेच अथवा सिस्टीमनुसार दोन्ही वेळा (पण काही दिवसांच्या अंतराने) ही बातमी नवी दिल्लीवरून दुपारी एका भव्य पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आली आणि बघता बघता/ऐकता ऐकता/सांगता सांगता सगळीकडे ती पोहचली, पण तेव्हा याच चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारलेल्या बालकलाकार अश्विन चितळे याची प्रतिक्रिया काय होती माहित्येय? तेव्हा तो शालेय वयात होता. पिक्चरमध्ये त्याला पाहताना त्याचे शालेय वय लक्षात येतेच. त्याला ही सुवर्णपदकाची बातमी समजली तेव्हा तो आपल्या घरीच होता आणि अशातच तो म्हणाला, आज सकाळीच ही बातमी जाहीर झाली असती तर ती मला माझ्या शाळेतील टीचरना पहिल्यांदा सांगता आली नसती का? मला भाव खात शाळेत फिरता आले असते... गंमत म्हणजे, हा पुरस्कार जाहीर झाला तेव्हा तुला काय वाटले? मीडियाच्या अशा हुकमी प्रश्नावर त्याने चक्क हेच उत्तर प्रामाणिकपणाने दिले. त्याचे हे बोल काही ठिकाणी चौकटीची गोष्ट ठरली, कारण पिक्चर हिट असल्याने तो स्टार होता आणि त्याच्या बोलण्याला वलय आले होते. कालांतराने आपल्या मुलाखतीत हीच गोष्ट तो रंगवून खुलवून आठवणीने सांगू लागला. अर्थात, त्याची ती उत्फूर्त प्रतिक्रिया म्हणजे त्याचे वयच तसे होते हे जसे खरे तसेच 'श्वास'बद्दल ज्या अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया उमटल्या, त्यात ही वेगळीच आहे की नाही सांगा? अश्विन चितळेचा आनंद वाढावा अशी गोष्टही घडली. त्याला काही दिवसांतच याच चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा पुरस्कार प्राप्त झाला. म्हणजेच त्याला एकाच भूमिकेसाठी आनंदीत होण्यास त्याला तीनदा संधी मिळाली.

बालकलाकारांसाठी आता चित्रपट, मालिका असे बरेच पुरस्कार आहेत. त्यात तीन नामांकनेही आहेत. म्हणजेच तीन बालकलाकारांत स्पर्धा आणि रंगलेल्या इव्हेन्टसमध्ये एकाच्या नावाची घोषणा. म्हणजेच उर्वरित दोघांची समजून घालण्याची जबाबदारी त्याच्या पालक व दिग्दर्शकाची.

बालकलाकाराच्या पुरस्काराचे फंडे अनेक. त्याची ही एक झलक. कलाकाराला पारितोषिकाचा आनंद होतोच, पण ज्या भूमिकेवर आपण भरपूर मेहनत घेतलीय तोच चित्रपट महत्त्वाच्या चित्रपट महोत्सवासाठी पाठवलाच नसेल तर? रंजनाला राजदत्त दिग्दर्शित श्री अष्टविनायक चित्र निर्मित, निर्माते अरविंद सामंत यांच्या 'अरे संसार संसार' (१९८१) आणि किशोर मिस्कीन निर्मित आणि व्ही.के. नाईक दिग्दर्शित 'गुपचूप गुपचूप' (१९८३) या चित्रपटातील अभिनयासाठी राज्य चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार प्राप्त झाला, पण रंजनाला अपेक्षित होते की, व्ही. शांताराम दिग्दर्शित 'चानी' (१९७७) आणि मनोहर रणदिवे निर्मित आणि राजदत्त दिग्दर्शित 'मुंबईचा फौजदार' (१९८४) यातील शकूच्या अभिनयासाठी हा पुरस्कार प्राप्त होईल, पण तसे घडले नाही. रंजनाच्या सर्वात जास्त अपेक्षा अनंत माने निर्मित आणि दिग्दर्शित 'सुशीला' (१९७८) या चित्रपटावर होत्या, पण तो चित्रपट या स्पर्धेसाठी पाठवलाच नाही, मात्र याच चित्रपटासाठी फिल्म फेअर पुरस्कार प्राप्त झाला. त्यावर काही बोलण्यापेक्षा रंजनाने या भूमिकेवर बोलणे पसंत केले. ही भूमिका साकारण्यापूर्वी लीला गांधी या चक्क तमाशा थिएटरमध्ये घेऊन गेल्या. तेथील सगळं वातावरण डोळ्यात साठवलं आणि मग ही भूमिका साकारली. तसं करणे खूप पत्थावर पडले असे रंजनाचे म्हणणे होते. सध्या चित्रपट पुरस्काराचे युग आहे, यानिमित्ताने या काही गोष्टी.

खरंतर दादासाहेब फाळके यांच्या ३० एप्रिल या जयंतीनिमित्त राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी राज्य चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात येते आणि दादासाहेब फाळके यांनी निर्माण केलेला पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' हा चित्रपट ३ मे १९१३ रोजी प्रदर्शित झाला, यानिमित्ताने दरवर्षी भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि दादासाहेब फाळके पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात येतो, दुर्दैवाने कोरोना काळात हे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे.

---

## उन्हाळा आणि उष्माघाताचे संकट : वेळीच व्हा सावध!

निसर्गाचे चक्र बदलत असून यंदा उन्हाळ्याने रौद्र रूप धारण करण्यास सुरुवात केली आहे. राज्याच्या अनेक भागांत तापमानाचा पारा चाळीशी पार गेला असून, सूर्याच्या प्रखर किरणांमुळे नागरिकांना त्रास होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, २०२६ हे वर्ष भारताच्या हवामान इतिहासातील सर्वात उष्ण वर्ष ठरण्याची शक्यता आहे. या भीषण




परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाने 'हीट वेव्ह'चा (उष्णतेची लाट) इशारा दिला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

जागतिक हवामान बदलामध्ये 'सुपर एल निनो' ही घटना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. समुद्र सपाटीचे तापमान वाढल्यामुळे जगभरातील हवामानावर याचे विपरीत परिणाम होतात. यामुळे भारतात मान्सूनवर परिणाम होण्याची आणि उन्हाळ्याची तीव्रता कमालीची वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अनेक राज्यांत तापमान ४५सेल्सीअस वर जाण्याचे संकेत आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या मानकानुसार किनारी प्रदेशासाठी : सलग दोन दिवस कमाल तापमान ३७ सेल्सिअसपेक्षा जास्त राहिल्यास. जेव्हा तापमान नेहमीच्या सरासरीपेक्षा ४.५ सेल्सिअस ते ६.४ सेल्सिअसने वाढते, तेव्हा त्याला 'उष्णतेची लाट' म्हणतात. : जेव्हा तापमान सरासरीपेक्षा ६.५ सेल्सिअसपेक्षा जास्त वाढते, तेव्हा अतिउष्ण लाट ही स्थिती जीवघेणी ठरू शकते.

**उष्माघाताची लक्षणे : वेळीच ओळखा धोका**

उष्माघात ही केवळ थकव्याची अवस्था नसून ती एक वैद्यकीय आणीबाणी आहे. खालील लक्षणे दिसताच सावध व्हावे...

१. शरीराचे तापमान कमालीचे वाढणे पण घाम न येणे.

२. चक्कर येणे, डोकेदुखी किंवा मळमळणे.

३. त्वचा कोरडी आणि लाल होणे.

४. तीव्र तहान लागणे आणि लघवीचे प्रमाण कमी होणे.

५. लहान मुलांमध्ये प्रचंड चिडचिड आणि सुस्ती येणे.

उष्णतेपासून बचावासाठी 'हे' करा (मार्गदर्शक सूचना)

**जलसंजीवन मंत्र**

तहान लागलेली नसली तरीही दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या. निसर्गदत्त पेयांचा वापर कराः लिंबू सरबत, ताक, शहाळ्याचे पाणी, आमसूल सरबत आणि घरगुती पन्हे शरीरातील ओलावा टिकवून ठेवतात.

**पोशाख आणि घराबाहेर पडताना काळजी**

बाहेर पडताना नेहमी सुती, हलके आणि पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे कपडे घाला. डोक्यावर टोपी, रुमाल किंवा छत्रीचा वापर करा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी गॉगल्स वापरा. शक्यतो दुपारी १२ ते ३ या वेळेत घराबाहेर पडणे टाळा.

**आहारातील बदल**

प्रथिनयुक्त आहार आणि मांसाहार उन्हाळ्यात कमी करावा, कारण तो पचायला जड असतो. बाहेरील उघड्यावरचे पदार्थ किंवा शिळे अन्न खाणे टाळा. अल्कोहोल, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड कोल्ड ड्रिंक्स टाळा, कारण यामुळे शरीरातील पाणी कमी होते.

**घराचे व्यवस्थापन**

दुपारच्या वेळी खिडक्यांना पडदे लावून ठेवा. रात्री हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा. घरातील वृद्धांची आणि लहान मुलांची विशेष काळजी घ्या.

**सामाजिक जबाबदारी**

आपण आपल्यासोबतच मुक्या प्राण्यांचीही काळजी घेणे गरजेचे आहे. घराबाहेर किंवा बाल्कनीत पक्ष्यांसाठी पाण्याचे भांडे ठेवा. पाळीव प्राण्यांना सावलीत बांधा आणि त्यांना पुरेसे पाणी द्या.

लक्षात ठेवा : उन्हाळ्याची ही तीव्रता केवळ निसर्गाचा कोप नसून वाढते औद्योगिकीकरण आणि जंगलतोडीचा परिणाम आहे. स्वतःचे रक्षण करण्यासोबतच पर्यावरणाचे रक्षण करणे, हेच उन्हाळ्यावरील कायमस्वरूपी उत्तर आहे.

आपत्कालीन संपर्क : तब्येत बिघडल्यास वेळ न घालवता जवळच्या डॉक्टरांशी संपर्क साधा किंवा १०८ या हेल्पलाईनवर रुग्णवाहिकेसाठी कॉल करा. सावध राहा, सुरक्षित राहा आणि उन्हाळ्याचा सामना धैर्याने करा!

**-प्रवीण डोंगरदिवे,** उपसंपादक
विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग


---

## सुप्रसिद्ध साहित्यिक राम शेवाळकर

सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक, उत्तम कीर्तनकार आणि प्रभावी वक्ते म्हणजे राम बाळकृष्ण शेवाळकर. आज त्यांचा स्मृतिदिन. त्यांचे मूळ गाव परभणी जिल्ह्यातील शेवाळे व मूळ आडनाव धर्माधिकारी, तर जन्म २ मार्च १९३१ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील अचलपूरला झाला. त्यांचे वडील विदर्भात ' कीर्तनकेसरी ' म्हणून प्रसिद्ध होते. त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी वेदशास्त्रसंपन्नतेची. पणजोबा रामशास्त्री शेवाळकर हे वेदव्यासंगी पंडित. संचित (१९७५) हा त्यांच्या मराठी व संस्कृत पदय रचनांचा संग्रह. शेवाळकरांचे वडील बाळकृष्ण हे कीर्तनकार आणि कीर्तनासाठी आख्याने लिहिणारे. राम शेवाळकर हे आपल्या वडिलांच्या अनुकरणातून, लहान वयातच कीर्तने पाठ करून ती सादर करीत. त्यामुळे त्यांच्यात सभाधीटपणा आणि अमोघ वाणी आली.

विदर्भातील अनेक उत्तम वयांचा उदा., डॉ. मुंजे, वीर वामनराव जोशी, बाबासाहेब खापर्डे, वि. घ. देशपांडे, पु. भा. भावे, बाळशास्त्री हरदास इत्यादींचा प्रभाव त्यांच्यावर पडला त्यामुळे समाजप्रबोधनाचे एक अमोघ साधन म्हणून वक्तृत्वाचे सामर्थ्य त्यांना जाणवले आणि त्यांनी स्वतःच्या वक्तृत्वगुणांचा विकास केला. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही त्यांनी कित्येक व्याख्याने दिली आणि 'वक्ता दशसहस्त्रेषु' अशी ख्याती त्यांना मिळाली. स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, साने गुरूजी ह्यांचे विचार त्यांनी श्रोत्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविले. त्याचबरोबर आपल्या काव्य व निबंधलेखनाने साहित्यिक म्हणूनही लौकिक प्राप्त केला.

त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अचलपूर येथेच झाले. शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर (१९४८), अमरावतीच्या विदर्भ महाविदयालयातून ते



बीए (१९५२) आणि नागपूर विदयापीठातून एमए (संस्कृत १९५४ मराठी १९५६) झाले. वाशीम येथील शासकीय प्रशालेत ते आरंभी शिक्षक होते (१९५४-५५) त्यानंतर निरनिराळ्या महाविदयालयांतून प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर वणी येथील लोकमान्य टिळक महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले.

लहानपणापासूनच ते काव्यरचना करीत होते. असोशी (१९५६) हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर रेघा (१९६७) आणि अंगारा (१९८९) हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले. निसर्गातील चैतन्याचा आणि सृजनशक्तीचा आविष्कार त्याच्या निरनिराळ्या रूपांतून पाहणे, त्यांना शब्दरूप देणे, हे त्यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्ट्य होय. कवितेखेरीज त्यांनी अनेक निबंधही लिहिले. अग्निमित्र (१९७६), अमृतझरा (१९७६), देवाचे दिवे (१९८९), रूचिभेद (१९८९)आणि सारस्वताचे झाड (१९८९), तारकांचे गाणे (१९९४) हे त्यांचे काही ललित निबंधसंग्रह होत. लोकनायक बापूजी अणे ह्यांच्या जन्मशताब्दीच्या वेळी त्यांनी लोकनायकांचे वाङ्मय स्वखर्चाने प्रकाशित केले, ही त्यांची एक विशेष उल्लेखनीय कामगिरी होय. त्यांनी संपादिलेल्या पुस्तकांत शिक्षणविचार (१९५५), यशोधन, त्रिविक्रम (३ खंड, १९९२) यांचा समावेश होतो. 'शिक्षणविचार'मध्ये आचार्य विनोबाजी भावे ह्यांचे शिक्षणविषयक विचार आहेत. 'यशोधन'मध्ये डॉ. य. खु. देशपांडे ह्यांचे संशोधनपर लेखन अंतर्भूत आहे. वा. ना. देशपांडे ह्यांचे स्फुटलेख त्रिविक्रम मध्ये आहेत. पाणियावरी मकरी (२००८) हे त्यांचे आत्मचरित्र.

शेवाळकरांनी अनेक वाङ्मयीन-सांस्कृतिक-शैक्षणिक संस्थांतून विविध पदांवर कार्य केले. विदर्भ साहित्य संघाचे ते सतत नऊ वर्षे अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा (उपाध्यक्ष) महाराष्ट्र साहित्य परिषद (उपाध्यक्ष) या संस्थांचे ते पदाधिकारी होते. साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ अशा शासकीय मंडळांवरही त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे. १९९४मध्ये पणजीत (गोवा) झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. यांखेरीज विविध संस्थांकडून त्यांना मानपत्रे मिळाली आहेत. नागपूर येथे ३ मे २००९ रोजी त्यांचे निधन झाले. (साभार : मराठी विश्वकोष)

---

## लेखक, गीतकार जगदीश खेबुडकर



जगदीश खेबुडकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील लेखक आणि गीतकार होते. त्यांचा आज स्मृतिदिन. खेबुडकर यांचा जन्म १० मे १९३२ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील हळदी गावात झाला. त्यांनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयातून साहित्यात कला शाखेची पदवी प्राप्त केली, जिथे त्यांचा मराठी साहित्यिकांशी व्यापक परिचय झाला.

खेबुडकर भजन, गझल आणि हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात पारंगत होते आणि त्यांनी आपल्या जादुई कामगिरीने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. पिंजरा, साधी माणसं, सामना, चंद्र होता साक्षीला आणि अष्टविनायक यासारख्या चित्रपटांमधील गाण्यांसाठी ते ओळखले जातात. इ.स. १९६०मध्ये त्यांचे पहिले चित्रगीत आणि पहिली लावणी मला हो म्हणत्यात लवंगी मिरची प्रदर्शित झाली. त्यांनी कारकिर्दीत ३०० चित्रपटांमध्ये २५०० गाणी लिहिली. तसेच त्यांनी ३५०० कविता, २५ कथा आणि पाच नाटकेदेखील लिहिली. जगदीश खेबुडकर यांचे ३ मे २०११ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

---

## राष्ट्रपती, शिक्षणतज्ज्ञ डॉ. झाकीर हुसेन

भारताचे तिसरे राष्ट्रपती व एक ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ पद्मविभूषण व भारतरत्न अशी डॉ. झाकीर हुसेन यांची ओळख राहिली आहे. त्यांचा आज स्मृतिदिन...

डॉ. हुसेन यांचा जन्म ८ फेब्रुवारी १८९७ रोजी अफ्रिदी अफगाण मुसलमान कुटुंबात हैदराबाद (सिंध) येथे झाला. त्यांचे वडील वकील होते, पण झाकिर हुसेन नऊ वर्षांचे होते, तेव्हा ते वारले. त्यामुळे शिक्षणासाठी त्यांना अनेक ठिकाणी हिंडावे लागले. इटावा, अलीगढ आणि बर्लिन या ठिकाणी शिक्षण घेऊन अखेर त्यांनी अर्थशास्त्र विषयात पीएचडी. ही पदवी मिळविली. ही पदवी मिळविण्यापूर्वी ते १९२०मध्ये जामिआ मिल्लिया इस्लामिया या शिक्षणसंस्थेकडे आकर्षित झाले होते. जर्मनीहून भारतात परत येताच त्यांनी आपले सर्व जीवन या संस्थेस समर्पित केले. १९२५मध्ये ही संस्था दिल्लीस हलविण्यात आली व तिचे झाकिर हुसेन १९२६मध्ये कुलगुरू झाले. त्यांनी जवळजवळ बावीस वर्षे (१९२६४८) या संस्थेचे कार्य केले व तिला एका अभिनव शिक्षणसंस्थेचे स्वरूप दिले.

शैक्षणिक वाटचालीतील त्यांची स्फूर्तिस्थाने दोन होती... महात्मा गांधी व जर्मन शिक्षणशास्त्रज्ञ केर्शेनस्टाइनर.




विद्यापीठात बौद्धिक स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य व भाषण स्वातंत्र्य पुरेपुर असावे आणि व्यासंगी विद्वानांचे ते सभास्थान व्हावे, कारण अशा वातावरणात विद्यार्थ्यांचे नीतिधैर्य विकास पावते अशी त्यांची धारणा होती. त्यांनी स्वयंशिक्षणावर भर देऊन नव्या शैक्षणिक कल्पना जामिआ मिल्लियामध्ये रुजविल्या. ते अलीगढ मुस्लिम विद्यापीठाचे कुलगुरू झाले (१९४८-५६). १९५६ साली ते राज्यसभेवर निवडून आले. पुढे ते बिहारचे राज्यपाल झाले आणि नंतर उपराष्ट्रपती म्हणून निवडले गेले (१९६२). १९६७मध्ये ते भारताचे राष्ट्रपती झाले.

अनेक शैक्षणिक समित्यांवर त्यांनी काम केले. त्यापैकी यूनेस्को, विद्यापीठ अनुदान आयोग, मध्यवर्ती माध्यमिक मंडळ, विद्यापीठीय शैक्षणिक आयोग ह्या काही महत्त्वाच्या संस्था होत. त्यांना अनेक परदेशीय आणि भारतीय विद्यापीठांनी डी. लिट्. ही सन्माननीय पदवी देऊन गौरविले. भारत सरकारने त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचा यथोचित गौरव पद्मविभूषण (१९५४) आणि सर्वोच्च असा भारतरत्न (१९६३) हा पुरस्कार देऊन केला. महात्मा गांधींचे ते प्रथमपासून निष्ठावान अनुयायी होते. महात्माजींनी त्यांना मूलोद्योग शिक्षण समितीचे १९३७मध्ये अध्यक्ष केले. आयुष्यभर त्यांनी या शिक्षणपद्धतीचा पुरस्कार केला.

डॉ. हुसेन यांनी शिक्षण, अर्थशास्त्र वगैरे विषयांचे आपले विचार अनेक व्याख्यानांद्वारे मांडले. त्यांपैकी काही व्याख्याने द डायनॅमिक युनिव्हर्सिटी या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. जर्मन भाषेमध्ये त्यांनी महात्मा गांधींचे चरित्र लिहिले, तसेच प्लेटोच्या रिपब्लिकचे उर्दूत भाषांतर केले. लहान मुलांकरिता काही गोष्टीही त्यांनी लिहिल्या.

स्फटिकांचा आणि चित्रविचित्र खड्यांचा संग्रह करणे, हा त्यांचा आवडता छंद होता. ते ग्रंथप्रेमी होते व त्यांचे ग्रंथालय नव्या नव्या ग्रंथांनी नेहमी भरलेले असे. राष्ट्रपती असतानाच ३ मे १९६९ रोजी नवी दिल्ली येथे ते हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावले. एक नेमस्त, चारित्र्यवान व शिक्षणतज्ञ असा राष्ट्रीय मुस्लिम नेता म्हणून त्यांचे कार्य महत्त्वाचे आहे. (साभार : विकासपीडिया)

# मोर्बा ज्युनिअर सायन्स कॉलेज बारावीचा निकाल ९२.०३ टक्के



**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल शनिवार २ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. या परीक्षेत माणगाव तालुक्यातील मोर्बा सोशल सोसायटीच्या मोर्बा ज्युनिअर सायन्स कॉलेजचा बारावी परीक्षेचा एकूण निकाल ९२.०३ टक्के असा नेत्रदीपक लागला असून कु.सदफ राऊत ७९.३३ टक्के गुण मिळून कॉलेजमध्ये प्रथम, कु. सदफ जावेद राऊत या विद्यार्थिनीने ७९.३३ टक्के म्हणजेच ६०० पैकी ४७९ इतके गुण संपादन करून कॉलेजमध्ये सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या कॉलेजमधून कु.मैहविश मुसा दाखवे या विद्यार्थिनीने ७८ .३३ टक्के म्हणजेच ६०० पैकी ४७० गुण मिळवून द्वितीय,कु.उमेमा अ.अजीज राऊत या विद्यार्थिनीने ७०.५० टक्के म्हणजेच ६०० पैकी ४२३ गुण मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

या कॉलेजमधून एकूण ११३ विद्यार्थी बारावी परीक्षेला बसले होते त्यापैकी १०४ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले.

दरम्यान, या कॉलेजचा निकाल दरवर्षी उंचावत असल्याने पालकवर्गांमधे विशेष आनंदाचे वातावरण दिसत आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.सैफुद्दीन धनसे,सेक्रेटरी अस्लम राऊत,शाळा समिती चेअरमन अ. कादीर इब्राहिम हर्णेकर, संस्थेचे सर्व पदाधिकारी व सभासद,संस्थेचे प्रशासकीय अधिकारी आसफ पल्लवकर, प्राचार्य खालिद अहंमद रशीद खान,सर्व शिक्षक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## कोएसो कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी परीक्षेचा ९०.४०% निकाल

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या कै. स. प्र. जैन कनिष्ठ महाविद्यालयाने इयत्ता १२ वी (एच.एस.सी.) परीक्षा मार्च/एप्रिल २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत ९०.४० टक्के एकूण निकाल नोंदविला आहे. या उज्वल निकालामुळे पालकवर्गात समाधान व्यक्त करण्यात आले असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या यशाबद्दल स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्रशेठ जैन, सदस्य, प्राचार्य डी. एम. पवार तसेच शिक्षकवर्ग यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शास्त्र शाखेचा निकाल ९७.४३ टक्के इतका लागला असून कुमारी लयबा इकबाल पानसरे हिने ८३.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. कुमार रितेश राजेश शिरसत याने ८३.१७ टक्के गुण मिळवत द्वितीय, तर कुमारी रिहाना जावेद अधिकारी हिने ८१.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

वाणिज्य शाखेचा निकाल ८०.४७ टक्के लागला. कुमारी पायल संतोष गुप्ता हिने ७५.०० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला. कुमारी मानसी गणेश फुलोरे हिने ७४.१७ टक्के गुणांसह द्वितीय, तर कुमारी आर्या भास्कर शिंदे हिने ६९.६७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला.

कला शाखेचा निकाल ७५.०० टक्के लागला. कुमारी समीक्षा पाटीलने ७८.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. कु. मनोज काशीराम माडेने ७५.४० टक्के गुणांसह द्वितीय, तर कुमार प्रविण शिंदेने ६३.३३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.

# स्वामीनारायण शाळेतील अपहार पकडण्यात पोलीस यशस्वी

**चौक : प्रतिनिधी**



खालापूर तालुक्यातील स्वामी नारायण या आंतरराष्ट्रीय शाळेतील अपहार झालेली रक्कम खालापूर पोलिसांच्या यशस्वी कामगिरीने परत मिळवण्यात यश आले आहे. त्यामुळे खालापूर पोलिसांचे कौतुक होत आहे.

काही दिवसांपूर्वी शाळेच्या संस्थेतून साडेपंधरा लाखांचा अपहार झाल्याची घटना घडली होती. याची तक्रार खालापूर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. दरम्यान, संस्थेच्या बँक खात्यातून विनापरवानगी रक्कम काढल्याप्रकरणी संस्थेच्या लेखापालासह अन्य एकावर खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

लेखापाल हिरेन गोंदालिया आणि तन्मय काछडीया या दोघांनी १५ लाख ५५ हजार ६०० रुपयांचा अपहार केल्याची तक्रार संस्थेतर्फे खालापूर पोलीस ठाण्यात सुरज हातमोडे यांनी दिली होती. खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी रायगड जिल्हा पोलीस अधिक्षक आँचल दलाल आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला सुरुवात केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे, पोलीस हवा. निलेश सोनवणे, पोलीस शिपाई अतुल चंदनशिवे, पोलीस शिपाई पंजाब पोले हे पथक गुजरात येथे रवाना झाले. त्यानंतर त्यांनी आरोपींच्या मुसक्या आवळून खालापूर येथे आणण्यात आले असता अपहार झालेली रक्कम त्यांनी पोलीस ठाण्यात जमा केली. या कामगिरीचे कौतुक होत आहे.



**खोपोली : खंडाळा घाटातील मिसिंग लिंकच्या उद्घाटनप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आले असता त्यांचे स्वागत खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे आणि उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी खोपोलीकरांचा सन्मान स्वीकारला. यावेळी शासकीय अधिकारी तसेच भारतीय जनता पक्षाचे स्थानीय नेते उपस्थित होते.**

# निलेश डेकोरेटर्सची सामाजिक बांधिलकी; वाहनचालक नियमावली फलक सुपूर्द

**कर्जत : प्रतिनिधी**

वाहतुकीचे नियम दंडात्मक कारवाईसाठी नाहीत तर वाहनचालकांच्या सुरक्षेसाठी आहे, असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे यांनी केले. या भागातील निलेश डेकोरेटर्सकडून नेरळ पोलीस ठाण्यासाठी वाहतूक नियमांची नियमावली असलेले फलक बनवून दिले. ते स्वीकारल्यानंतर नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी बोलत होते.

रायगड पोलिस अधीक्षकांच्या सूचनेने जिल्ह्यात वाहतूक नियमांबाबत व्यापक जनजागृती मोहीम आणि नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई सुरू आहे. नेरळ आणि परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतूक नियमांचे पालन व्हावे. या उद्देशाने रायगड जिल्हा पोलीस आणि नेरळ पोलीस ठाण्यामार्फत एक विशेष जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेद्वारे नागरिकांना रहदारीचे नियम पाळण्याचे आवाहन केले जात आहे. नेरळ परिसरातील वाहनचालक वाहतूक नियमांची माहिती मिळावी आणि अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी ही जनजागृती मोहीम राबवण्यात येत आहे. या सामाजिक उपक्रमात नेरळ भागातील निलेश डेकोरेटर्सचे मालक निलेश भोईर यांचे विशेष सहकार्य लाभले असून त्यांच्या माध्यमातून शहराच्या विविध भागांत जनजागृतीपर फलक लावण्यात आले आहेत. वाहतूक हवालदार नितीन अहिरे यांनी स्वतः उपस्थित राहून जागोजागी फलक लावून घेतले. उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## मोबाईलवर आपत्कालीन सायरनची चाचणी; नागरिक झाले भयभीत!

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी केंद्र सरकारकडून देशभरात मोबाईलवर वाजणाऱ्या आपत्कालीन सायरन प्रणालीची टप्प्याटप्प्याने चाचणी सुरू होणार आहे. याद्वारे भूकंप, पूर, चक्रीवादळ यांसारख्या आपत्तीवेळी नागरिकांना त्वरित इशारा दिला जाईल. याची चाचणी २ मे रोजी सकाळी ११:४५ वाजेनंतर झाली. अचानक मोबाईलवर दोनदा सायरन वाजल्याने मोबाईलधारक घाबरले. केंद्र सरकारकडून आपत्ती व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी मोबाईल अलर्ट सायनर वाजल्याचे समजताच चाचपणी करणारे शांत झाले.

"सेल ब्रॉडकास्ट अलर्ट" तंत्रज्ञानावर आधारित या सुविधेमुळे इंटरनेट किंवा एसएमएसशिवायही अलर्ट मिळू शकतो. दरम्यान, चाचणीदरम्यान मोबाईलवर मोठा सायरन वाजत "ही फक्त चाचणी आहे" असा संदेश दिसेल. ही प्रक्रिया पूर्णपणे प्रायोगिक असून नागरिकांनी घाबरू नये आणि अफवा पसरवू नयेत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# मंत्री भरत गोगावलेंच्या हस्ते ‘अनगड मोती’चे प्रकाशन; दुर्मीळ साहित्य जतनासाठी सहकार्य

**महाड : प्रतिनिधी**



महाड येथील ज्येष्ठ साहित्यिक व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी शिक्षक प्रभाकर भुस्कुटे यांच्या ‘अनगड मोती’ या पुस्तकाचे प्रकाशन राज्याचे कॅबिनेट मंत्री तथा महाडचे आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. भुस्कुटे गुरुजींच्या एकूण ३६ ग्रंथसंपदेचे आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने जतन व संवर्धन करण्याच्या संकल्पनेला सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन गोगावले यांनी यावेळी दिले.

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून संकल्प प्रतिष्ठान महाडच्या वतीने आणि हिरवळ प्रतिष्ठान, कोमसाप महाड, रंगसुगंध, होप फाउंडेशन यांच्या सहकार्याने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक येथील बहुउद्देशीय सभागृहात सायंकाळी हा सोहळा पार पडला. या सोहळ्याच्या व्यासपीठावर मंत्री गोगावले यांच्यासमवेत पद्मश्री डॉ. हिम्मतराव बावस्कर, नगराध्यक्ष सुनील कविस्कर, हिरवळ प्रतिष्ठानचे किशोर धारिया, प्रसिद्ध निवेदक संजय भुस्कुटे, अर्बन बँक चेअरमन शोभा सावंत, उपनगराध्यक्ष संदीप जाधव, बांधकाम सभापती सुमित पवार, परांजपे विद्यामंदिर माजी मुख्याध्यापक सतीशचंद्र टिपणीस, कोमसाप महाड अध्यक्ष गंगाधर साळवी, नरेंद्र महाडिक, प्रदीप शेठ आदी मान्यवर उपस्थित होते.

‘अनगड मोती’ हे भुस्कुटे गुरुजींचे ३६ वे पुस्तक असून त्यांनी याआधी महाडच्या दुर्मीळ इतिहासावर तसेच अनेक थोर व्यक्तींवर लेखन केले आहे. या पुस्तकामध्ये महाड तालुक्यातील विस्मृतीत गेलेल्या, मात्र समाजकार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या २७ अपरिचित व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा वेध घेण्यात आला आहे.

मंत्री गोगावले यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ‘अनगड मोती’ या पुस्तकातील लेखकाच्या मनोगतातील काही ओळी वाचताना इतके साहित्य निर्माण करूनही गुरुजी कुठेही स्वतःला मोठा विद्वान किंवा महान लेखक समजत नाहीत, हेच त्यांच्या महानतेचे लक्षण आहे. येणाऱ्या काळात महाड शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना व विकासकामे प्रगतीपथावर असून व्यापारी वर्गाला दिलासा मिळावा व महापुराचा धोका कमी व्हावा यासाठी नदीपात्रातील गाळ काढण्याच्या कामालाही प्रारंभ करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

किशोर धारिया यांनी आपल्या मनोगतातून गुरुजींच्या संस्कारांमुळेच आपण घडल्याचे सांगितले. आज वयाच्या ८५ व्या वर्षी गुरुजींनी दिलेली ३६ पुस्तके भावी पिढीसाठी प्रेरणादायी असून त्यातील अनेक पुस्तके दुर्मीळ असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

या सर्व साहित्याचे डिजिटलायझेशन करून हा अमूल्य ठेवा जतन करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त करताना मंत्री गोगावले यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली असता गोगावले यांनी त्वरित धारिया यांच्या या संकल्पनेला दुजोरा देत भुस्कुटे गुरुजींचे साहित्य आधुनिक पद्धतीने जतन प्रक्रियेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे ठोस आश्वासन दिले.

यावेळी नगराध्यक्ष सुनील कविस्कर, अर्बन बँक चेअरमन शोभा सावंत, उपनगराध्यक्ष संदीप जाधव, कोमसाप महाड अध्यक्ष गंगाधर साळवी, प्रसिद्ध निवेदक संजय भुस्कुटे, डॉ. चंद्रशेखर दाभाडकर, बांधकाम सभापती सुमित पवार, प्रा. समीर बुटाला, अ. वि. जंगम, नगरसेविका विद्या देसाई, नगरसेवक हेमंत चांदलेकर यांनी मनोगत व्यक्त करून भुस्कुटे यांच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र महाडिक यांनी केले, तर सूत्रसंचालन अविनाश घोलप यांनी केले.

## गुणवंत, करदाते, विकासपुरुषांचा सत्कार; ग्रामविकासाला नवी प्रेरणा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



महाराष्ट्र दिनाच्या औचित्याने रानवली ग्रामपंचायतीने गावाच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलणाऱ्या विविध क्षेत्रांतील गुणवंत, कर्तव्यदक्ष करदाते, लोकप्रतिनिधी, दानशूर व्यक्ती तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करून एक आदर्श घालून दिला. ग्रामपंचायत प्रांगणात पार पडलेला हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात आणि टाळ्यांच्या कडकडाटात संपन्न झाला.

या वेळी बोलताना श्रीवर्धन पंचायत समितीचे सभापती सचिन किर यांनी सांगितले की, “कर्तव्यदक्ष करदाते हे ग्रामपंचायतीच्या विकासाचे खरे आधारस्तंभ आहेत. वेळेवर कर भरणाऱ्या नागरिकांमुळे ग्रामनिधी सुदृढ होतो आणि गावाच्या प्रगतीला गती मिळते. त्याचबरोबर लोकप्रतिनिधी, दानशूर व्यक्ती आणि प्रामाणिक अधिकारी-कर्मचारी यांच्या एकत्रित योगदानामुळे गाव समृद्धीकडे वाटचाल करते.

१ ते १५ एप्रिल २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या विशेष कर वसुली मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवून प्रामाणिकपणे कर भरणाऱ्या ग्रामस्थांचा विशेष सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या आर्थिक बळकटीसाठी हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

रायगड प्रज्ञा शोध परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवून प्रथम पाच क्रमांकात स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला श्रीवर्धन पंचायत समितीच्या उपसभापती पुजा शिंदे, सदस्य सुकुमार तोंडलेकर माजी सभापती , बाबुराव चोरघे माजी सदस्य समाजसेवक राजू जाधव तसेच ग्रामपंचायतीचे उपसरपंच व सर्व सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामविकास अधिकारी अभिजित माने यांनी केले. सरपंच सुरेश मांडवकर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.



**खोपोली : अरुण पांडुरंग पाटील यांची शिवसेना खोपोली शहर सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली. आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते त्यांना शिवसेना पक्षाच्या आढावा बैठकीत नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, शहरप्रमुख व नगरसेवक संदीप पाटील, माजी नगरसेवक व ज्येष्ठ नेते मोहन अवसरमल तसेच पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : जयवंत माडपे)

# रोह्यातील महादेववाडीत बैलगाडीप्रेमींनी अनुभवला शर्यतीचा थरार; प्रेक्षकांची झाली तुंबळ गर्दी

**रोहा : प्रतिनिधी**



समस्त रोहेकरांचे लक्ष लागलेल्या रोहा तालुक्यातील महादेववाडी येथील बैलगाडी स्पर्धेचा थरार रोहेकर नागरिकांनी अनुभवला. पंचायत समिती सदस्य सुरेश मगर आणि सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर पुरस्कृत महादेववाडी ग्रामस्थ यांच्यावतीने आयोजित बैलगाडी स्पर्धा शुक्रवारी सायंकाळी महादेववाडी येथे पार पडली.

स्पर्धेचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ओबीसी जनमोर्चा रोहा तालुका अध्यक्ष अनंत थिटे, ओबीसी जनमोर्चा तळा तालुका अध्यक्ष सचिन कदम, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, वाशी उपसरपंच अरविंद मगर, प्रसिद्ध शाहीर अनंत मगर, वाशी तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रकांत भगत, सामाजिक कार्यकर्ते संदीप मोहिते, ग्रामपंचायत सदस्य संजय भगत, विकास खांडेकर, अमोल शिंगरे, रमेश गोवर्धने, सचिन सुतार, सागर भगत, राजेंद्र सुतार, चंद्रकांत सुतार आदी उपस्थित होते.

प्रमोद म्हसकर सुंदर असे महादेववाडी ग्रामस्थांच्यावतीने बैलगाडी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रथम क्रमांक किशोर सावंत तळवली, द्वितीय काळभैरव नवखार, तृतीय जनाबाई किल्ला, सेमी फायनल मध्ये प्रथम जय महाकाल इंदापूर, द्वितीय महेश मगर वार्देली, तृतीय गणेश सुतार महादेववाडी यांनी पटकावला आहे.

## खालापूर तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



**चौक :** महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस खालापूर तहसील कार्यालयात तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला.

तहसीलदार अभय चव्हाण यांनी उपस्थितांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, नायब तहसीलदार सुधाकर राठोड, माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील, नगरसेवक राहुल गायकवाड, जिप सदस्य संतोष बैलमारे, अॅड. राजेंद्र येरूनकर, माजी उपसभापती उमेश गावंड, नागरिक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# उरणकरांना अतिरिक्त पाणी कपातीपासून दिलासा

## जल नियोजनासाठी एमआयडीसीची चाचपणी

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्रात सर्वत्र पाणी कपातीचे सत्र सुरू असताना उरणकरांना मात्र अतिरिक्त पाणी कपातीपासून दिलासा मिळाला आहे. उरण तालुक्यातील रानसई धरणातून केला जाणाऱ्या पाणी पुरवठ्यात आधीपासूनच दोन दिवसांची कपात होत आहे. पाणीसाठ्याचे योग्य नियोजन केल्याने यंदा टंचाईकाळात अतिरिक्त कपातीपासून उरणकरांचा बचाव झाला आहे. सध्याच्या पाणीसाठ्याबाबत एमआयडीसी चाचपणी करीत आहे.



महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या रानसई धरणातून उरण शहर आणि येथील २३ ग्रामपंचायतींना करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्यात नोव्हेंबरपासूनच कपात केली आहे. आठवड्यातील मंगळवार आणि शुक्रवारी ही कपात केली जाते. उरणच्या रानसई धरणाची पाणी साठवणूक क्षमता कमी असल्याने पावसाळ्यातील कालावधीत लाखो लिटर पाणी वाया जाते. त्यामुळे येथील नागरिकांना नोव्हेंबरपासूनच पाणी कपातीचा सामना करावा लागतो. उरणकरांना दररोज ४१ दशलक्ष लिटर पाण्याची गरज असताना एमआयडीसीकडे केवळ ३० दशलक्ष लिटर पाणी असल्याने तूट भरून काढण्यासाठी कपात केली जाते. दुसरी समस्या म्हणजे धरण क्षमता वाढवण्याचा प्रस्ताव धूळ खात पडला आहे. पाणी क्षमता वाढविण्यासाठी एमआयडीसीने तयार केलेला प्रस्ताव अनेक वर्षे धूळ खात पडला आहे. ही समस्या निकाली लागल्यास उरणकरांना मुबलक प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध होईल.

> **उरण तालुक्यातील रानसई धरणातील पाणीसाठ्याच्या वापराचे नियोजन नोव्हेंबरपासून सुरू आहे. सध्याच्या पाणीसाठ्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून माहिती घेण्यात येत आहे तसेच जास्तीत जास्त पाणी बचतीकडे लक्ष दिले जात आहे.**
>
> **– जी. एन. सोनवणे, उपअभियंता, एमआयडीसी, उरण**



## जुगारावर कारवाई; दोघांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलिसांनी जुगारावर कारवाई केली. यातील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून तिघे पळून गेले. पनवेल एसटी स्टँडच्या मागे पाण्याच्या टाकीसमोर मोकळ्या जागेत जहीर शरफुद्दीन तांडेल (रा. शिवाजीनगर झोपडपट्टी, पनवेल), सचिन जितेंद्र नागपाल (रा. करंजाडे) आणि इतर तीन इसम हे अंदर बाहर हा जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला. यावेळी १९ हजार ४३० रुपयांच्या साधनांसह दोघे जण सापडून आले आणि तिघे जण पळून गेले.

## उरणच्या कस्टम बॉण्डेड वेअरहाऊसमधून मालाची चोरी

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यात अनेक ठिकाणी चोऱ्यांचे सत्र सुरू असून नुकतीच एक चोरीची घटना समोर आली आहे. उरण तालुक्यातील जेएनपीटी बंदरात आयात झालेल्या व कस्टम विभागाने पुढील कारवाईसाठी भोम गाव येथील सुयश लॉजिस्टिक्स प्रायव्हेट लिमिटेड आणि सुयश कमोडिटीजच्या वेअरहाऊसमध्ये पुढील कारवाईसाठी ठेवलेल्या कंटेनरमधील तब्बल ७० लाख ३१ हजार रुपये किमतीच्या मालाची चोरी झाल्याचे उघडकीस आले आहे. उरण पोलिसांनी या चोरी प्रकरणात सहभागी असलेल्या विनायक नायडू आणि इतर आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

पीयूष अग्रवाल (५३) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार द प्रेमिसो, ध्रुवा इंटरनॅशनल आणि एन. एम. शाह कॉर्पोरेशन या तीन कंपन्यांनी आयात केलेला माल कस्टम विभागाने तपासणीसाठी जप्त केला होता. हा माल सुयश लॉजिस्टिक्सच्या वेअरहाऊसमध्ये ठेवण्यात आला होता, मात्र १४ मे २०२५ ते १६ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विनायक नायडू आणि त्याच्या इतर साथीदारांनी या वेअरहाऊसमध्ये प्रवेश करून या मालाची चोरी केली. हा प्रकार लक्षात येताच त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.

चोरट्यांनी तीन वेगवेगळ्या बिल ऑफ एण्ट्रीनुसार या मालावर डल्ला मारला आहे, ज्यात प्रामुख्याने ट्रॉली, ब्रेसलेट, पोर्टेबल शिलाई मशीन, शूज व सॉक्स (५३,३५,००० रुपये), चिकटपट्टी, वेस्ट बॅग, सफाई संच, कॉफी कप, ब्रँडेड शूज (नायके, ॲडिडास, ॲसिक्स), अंडरगारमेंट आणि लहान मुलांच्या बॅगा (१०,२९,८९१ रुपये) व प्लास्टिक पाण्याच्या बाटल्या, मुलांच्या स्कूल बॅग, चुंबक, पेन्सिल पाऊच (६,६६,४८६ रुपये) असा एकूण ७० लाख ३१ हजार रुपये किमतीचा माल चोरला आहे. उरण पोलीस ठाण्याचे व.पो.नि. हनिफ मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली, स.पो.नि. अभिजीत देशमुख या प्रकरणाचा तपास करीत आहेत. उरणमध्ये चोरीच्या घटना वारंवार होत असून याला वेळीच लगाम बसविणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## संगीता ढेरे यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र दिनाचे तसेच कामगार दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्ह्यातील उरण येथील ज्येष्ठ समाजसेविका संगीता सचिन ढेरे यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत राज्य शासनाच्या प्रतिष्ठित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या या गौरव सोहळ्यात त्यांना सन्मानचिन्ह व मानपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांची प्रमुख



उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना ढेरे यांच्या कार्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. संगीता ढेरे यांनी उरण परिसरात महिला सक्षमीकरण, बालकल्याण, शिक्षण आणि समाजजागृती या क्षेत्रांत सातत्याने काम केले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना स्वावलंबनाचा मार्ग सापडला असून सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. महिला बचत गटांना एकत्रित करून त्यांच्यात समन्वय घडून आणून विविध उत्पादने वस्तू निर्मितीला त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. वेगवेगळे मेळावे, स्टॉल लावून तसेच महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विविध कार्यक्रम त्यांनी राबविले आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्य शासनाने त्यांना या मानाच्या पुरस्काराने सन्मानित केले. संगीता ढेरे यांना मिळालेला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार हा त्यांच्या कार्याची पावती असून समाजसेवेचा आदर्श ठरतो. उरणमधील ज्येष्ठ महिला सामाजिक कार्यकर्त्या संगीता ढेरे यांना राज्य शासनाचा प्रतिष्ठित पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## नागरिकांच्या मनात कलिंगडाची भीती; मागणी घटली

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत बिर्याणीनंतर कलिंगड खाल्ल्याने एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर सर्वसामान्य नागरिकांच्या मनात कलिंगडाविषयी भीती निर्माण झाली असून बाजारात कलिंगडाची मागणी अचानक घटली आहे. कलिंगड खाऊन काही झाले तर? अशी भीती लोकांच्या मनात निर्माण झाली आहे.

उन्हाळ्यात कलिंगडांना मोठी मागणी असते. त्यामुळे मुंबई बाजारात दररोज सरासरी ४० गाड्या कलिंगडांची आवक होत असते. घाऊक बाजारात कलिंगड १० ते १५ रुपये किलो या दरापर्यंत विकला जात आहे, तर किरकोळ बाजारात कलिंगड २० ते ३० रुपये किलो दराने मिळत आहेत. सर्वसाधारणपणे किरकोळ बाजारात एक कलिंगड ४० रुपयांपासून ८० रुपयांपर्यंत उपलब्ध आहे.



मंगळवारपासून किरकोळ बाजारात कलिंगडाला उठाव कमी झाला असल्याचे व्यापारी सांगत आहेत. कलिंगड घेताना ग्राहक त्याची व्यवस्थित चौकशी करून तपासून घेत आहेत. बऱ्याच ग्राहकांनी कलिंगडाकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे. कलिंगड खाऊन मुंबईत ती घटना घडली आहे. कलिंगड चांगले आहे की नाही, कलिंगड खाऊन काही होणार तर नाही ना, असे प्रश्न अनेक ग्राहक कलिंगड विक्रेत्यांना विचारत आहेत. कलिंगडाबाबत नागरिकांच्या मनात अनेक संभ्रम निर्माण झाले आहेत. त्यामुळे कलिंगड घेण्यासाठी ग्राहक पुढे येत नसल्याचे चित्र आहे.

कलिंगड विक्रेत्यांची पोलीस चौकशी करीत आहेत. कलिंगडाचे नमुने तपासणीसाठी घेऊन जात आहेत. त्यामुळे कलिंगड विक्रीसाठी नको असे निरोप मुंबईतील व्यापाऱ्यांनी वाशीतील भाऊ व्यापाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे कलिंगडाला उन्हात मिळणारा उठाव कमी झाला आहे. दरवर्षीच्या मानाने यावर्षी कलिंगडाचे उत्पादन आणि आवक तशीही कमी आहे. आता कलिंगडाला उठाव मिळत नसल्याने कलिंगडाच्या व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होऊ लागले आहे.

## नेरूळ येथे नागरी कामांचे उद्‌घाटन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

१ मे महाराष्ट्र व कामगार दिनी नवी मुंबई मनपा प्रभाग क्रमांक २३ कुकशेत, नेरूळमधील विविध नागरी सुविधा विकासकामांचे उद्‌घाटन करण्यात आले. याची माहिती स्थानिक नगरसेवक, सभापती नगर रचना तसेच नेरूळ विभाग सूरज पाटील यांनी दिली. महापौर सुजाता पाटील यांच्या हस्ते या नागरी कामांचे उद्‌घाटन करण्यात आले.

प्रभागातील विविध विकासकामांत सारसोळे गाव, सेक्टर ६, येथील जिजामाता उद्यानलगत पदपथ दुरुस्ती, कुकशेत गाव, सेक्टर १४ येथील मुख्य नामफलकाची सुधारणा, वाढीव मजल्याचे मार्केट, नवी मुंबई मनपा शाळा क्रमांक १२ इमारतीची दुरुस्ती व सुधारणा, नेरूळ पाम बीच सर्विसलगत ट्री बेल्टमधील आसन व्यवस्थेवर शेड उभारणी, नेरूळ सेक्टर ८ मधील ज्ञानेश्वर शेलार सांस्कृतिक केंद्रात बैठी शौचालय बांधणे आदी विकासकामांचा समावेश असल्याचे सूरज पाटील यांनी सांगितले.

## सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा धामापूरकर यांना बढती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत असणारे कृष्णा धामापूरकर यांना बढती मिळून ते पोलीस निरीक्षकपदी नियुक्त झाले असून नवी मुंबई विमानतळ (इमिग्रेशन) या ठिकाणी कार्यरत राहणार आहेत.



पनवेल शहर पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत असणारे कृष्णा धामापूरकर यांना बढती मिळून पोलीस निरीक्षकपदी शासनामार्फत नियुक्ती करण्यात आली आहे. पनवेल शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना त्यांनी विविध गुन्ह्यांची उकल केली आहे. त्यांना मिळालेल्या बढतीचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या माध्यमातून छोट्याखानी कार्यक्रमात वपोनि नितीन ठाकरे यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शेवटच्या क्षणापर्यंत कार्यरत राहणारा एक उत्तम अधिकारी म्हणून कृष्णा धामापूरकर यांची आठवण सदैव राहील, असे गौरवोद्‌गार यावेळी वपोनि नितीन ठाकरे यांनी काढले.

## बनावट प्रमाणपत्राने रेल्वे तिकीट लाटण्याचा प्रयत्न

### खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद

**पनवेल : वार्ताहर**

कर्करोगी असल्याचे खोटे भासवून रेल्वे तिकीट सवलत मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा प्रकार उघडकीस आला असून याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवाशांकडून अधिक पैसे उकळून रेल्वे प्रशासनाची व शासनाची फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

रेल्वे तिकीट काढून देणारी टोळी यामध्ये सक्रिय असल्याचे बोलले जात आहे. २३ एप्रिलला सायंकाळी ६.१० वाजता पनवेल रेल्वे स्थानकातील तिकीट काउंटर क्रमांक २ येथे हा प्रकार घडला. आरोपींनी कर्करोगी रुग्णांसाठी मिळणाऱ्या रेल्वे सवलतीचा गैरफायदा घेण्यासाठी बनावट प्रमाणपत्र तयार केले. हे प्रमाणपत्र टाटा मेमोरियल सेंटरच्या अधिकृत कागदपत्रांसारखे भासवण्यात आले होते.

त्यावर संबंधित कर्मचाऱ्याची बनावट सही आणि रूग्णालयाचे बनावट शिक्केदेखील मारण्यात आले होते. रेल्वे कर्मचा–याच्या सतर्कतेमुळे ही बाब उघडकीस आली. ३० एप्रिल रोजी 'गोल्डन टेम्पल मेल' (गाडी क्रमांक १२९०३) मध्ये बांद्रा टर्मिनस ते अंबाला कॅन्ट या मार्गावर दोन प्रवाशांना कर्करोगी रुग्ण म्हणून दाखवून सवलतीचे तिकीट मिळवून देण्यात आले.

प्रत्यक्षात या प्रवाशांकडे चौकशी केल्यावर ते कर्करोगी नसतानाही त्यांच्याकडे बनावट प्रमाणपत्र आढळली. या प्रकरणी अनोळखी व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) व ३३६(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद फडतरे या प्रकरणाचा तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकारामुळे रेल्वे प्रशासनासह टाटा हॉस्पिटल व शासनाची फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. अशा पद्धतीने मागील किती दिवस रूग्णालयाच्या नावाचे बनावट प्रमाणपत्र किती वेळा वापरण्यात आले, संबंधित प्रवाशांपर्यंत ही टोळी कशी पोहचते याची चौकशी करत आहे. कर्करोगी रूग्णांच्या नावावर अशा पद्धतीने फसवणूक करण्याचा हा पहिलाच गुन्हा खारघर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. या गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मिलिंद फडतरे करीत आहेत.

## महावितरण कर्मचाऱ्याचा रेल्वेच्या धडकेत मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

कर्तव्यावर असताना वीजपुरवठ्याची तक्रार सोडवून परतत असताना रेल्वेच्या धडकेत एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. सीकेटी कॉलेज ते बालभारतीदरम्यान असलेल्या रेल्वे अंडरपासजवळ हा अपघात घडला. ३० एप्रिल २०२६ रोजी रात्री ८:१५ च्या सुमारास मनोज पाटील व अमोल पैठणे हे दोघे ऑन–ड्युटी असताना बालभारती परिसरातील एका दुकानाच्या वीजपुरवठा दुरुस्तीसाठी गेले होते. तक्रार निवारण करून परतत असताना, अमोल पैठणे हे लघुशंकेसाठी रेल्वे ट्रॅकच्या कडेला गेले. मात्र, काळोख असल्याने ट्रेनचा अंदाज न आल्याने त्यांचा भीषण अपघात झाला. त्यांना तातडीने नाना धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले, परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. ज्या ठिकाणी हा अपघात झाला तिथे यापूर्वीही अनेकदा अशा दुर्घटना घडल्या आहेत.

## रसायनीत उष्म्याने हाहाकार!

**मोहोपाडा : वार्ताहर**

राज्यभर उष्णतेचा पारा प्रचंड चढला असून नागरिकांच्या अंगाची अक्षरशः लाहीलाही होत आहे. खालापूर तालुक्यात एप्रिलच्या पहिल्या पंधरवड्यापासून सूर्याने रौद्र रूप धारण केले आहे. मागील काही दिवसांपासून खालापूर तालुक्याचा तापमान पारा सातत्याने ४० अंश सेल्सिअसच्या आसपास स्थिरावला असून, कडक उन्हामुळे अक्षरशः नागरिक होरपळून निघत आहेत.

वाढत्या उष्णतेमुळे दुपारी १२ ते ४ या वेळेत शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर शुकशुकाट पाहायला मिळत असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. रात्रीचे तापमानही वाढत आहे. यंदाचा उन्हाळा अधिक तापदायक ठरणार असल्याचे चित्र दिसत आहे. सध्या उन्हामुळे घराबाहेर फिरणे अवघड झाले आहे. उन्हात गेल्याने अंगाची लाही लाही होत आहे. उन्हाचा पारा चांगलाच वाढला आहे. दुपारचे तापमान चाळीशी पार गेले आहे. रात्रीचे तापमानही वाढत आहे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी सतर्कता बाळगण्याचे



आवाहन प्रशासनाने केले आहे. हवामान खात्याकडून राज्यभर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

राज्यभरासह खालापूर तालुक्यात सूर्य आग ओकत असल्याने शहरासह तालुक्यातील जनजीवनावर परिणाम झाला आहे. तर बाजारपेठ भागातील रस्ते दुपारी निर्मनुष्य होत असून अघोषितची संचारबंदीसारखी स्थिती निर्माण झाली आहे. सकाळपासून तापमान वाढत आहे. दुपारी घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. त्यामुळे टोप्या, छत्र्या बाहेर आल्या आहेत. उन्हाने रस्ते तापू लागले आहेत. थंड पेयाच्या दुकानात नागरीकांची गर्दी वाढली आहे. मागिल १५ दिवसांपासून उन्हाचा कडाका वाढला आहे. सुर्य आग ओकत असल्याने तापमानाची नोंद ४० अंश सेल्सिअस झाली आहे. २ मे रोजी कमाल तापमानाची तब्बल ४२ अंश सेल्सिअस अशी उच्चांकी नोंद झाली. वाढत्या उष्मामुळे दिवसा शरीराची अक्षरशः काहिली होत आहे. विशेष म्हणजे किमान तापमानातदेखील वाढ झाली असून त्यामुळे रात्रीचा उकाडादेखील असह्य होऊ लागला आहे.

उष्णतेची लाट आणखी तीव्र होण्याची शक्यता लक्षात घेता नागरिकांनी स्वतःची काळजी घेणे अत्यंत आवश्यक असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. विशेषतः दुपारी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत घराबाहेर पडणे टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. भरपूर पाणी पिणे, हलके आणि सैल कपडे वापरणे, डोक्यावर टोपी किंवा कापड ठेवणे आणि उन्हात दीर्घकाळ उभे राहणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे. चक्कर येणे, डोकेदुखी, ताप, अशक्तपणा किंवा उलट्या यांसारखी लक्षणे दिसल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक इसम कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

बिक्रम रणजित प्रधान (४२, रा.डी–मार्टच्या मागे, कळंबोली) असे नाव असून, रंग सावळा, अंगाने मध्यम, उंची ५ फूट ३ इंच, नाक सरळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे तसेच अंगात निळ्या रंगाची हाफ पॅन्ट व काळ्या रंगाचा टी–शर्ट व पायात चप्पल घातलेली आहे. त्याला उडीया व हिंदी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पो.हवा.सचिन हराळे यांच्याशी संपर्क साधावा.

## स्टीलच्या पार्टची चोरी

**पनवेल :** अज्ञात आरोपीने दीड कोटी रुपयांच्या स्टीलचे चाइल्ड पार्टस चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी काम करत असलेला टाटा प्रॉडक्ट लिमिटेड कंपनीचे पलावा डोंबिवली या ठिकाणी शिळफाटा ते कल्याण असे रेल्वे लाईनच्या वर ब्रिजच्या कामासाठी लागणारे दीड कोटी रुपयांचे स्टीलचे चाईल्ड पार्ट हे पनवेल येथील करंजाडे सेक्टर वनमधील रेल्वेच्या जागेतील ओपन स्टोअर्समध्ये ठेवले आहेत. हे स्टील चाइल्ड पार्ट अज्ञात इसमाने चोरून नेले.

## एज्युसिटी प्रकल्पाला गती

### करंजाडेतील १०० हेक्टर जमीन निश्चित; पुढील तीन वर्षांत उभारणी

**पनवेल : वार्ताहर**

परदेशातील नामांकित विद्यापीठांचे कॅम्पस एकाच ठिकाणी उभारण्याच्या उद्देशाने राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'एज्युसीटी' प्रकल्पाला नवी मुंबईत गती मिळाली असून करंजाडे येथे १०० हेक्टर जागेवर या प्रकल्पाची आखणी सुरू झाली आहे. या प्रकल्पामुळे परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातच आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध होणार असल्याने शिक्षण क्षेत्रात मोठा बदल अपेक्षित आहे.

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असलेल्या 'एज्युसिटी'साठी सिडको मंडळाने करंजाडे येथील जमीन निश्चित केली आहे. यापूर्वी कुंडेवहाळ गावाजवळील जागेवर हा प्रकल्प उभारण्याचे नियोजन होते, मात्र करंजाडे येथील जमीन सपाट आणि विकासास अनुकूल असल्याने येथे पायाभूत सुविधा उभारणे सोपे जाईल, या कारणास्तव अंतिम निवड करण्यात आल्याची माहिती सिडकोच्या सूत्रांनी दिली.

हा प्रकल्प सुमारे १०० हेक्टर क्षेत्रात उभारला जाणार असून यात परदेशातील १० नामांकित विद्यापीठांना शिक्षण सेवा देण्याची संधी मिळणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून अवघ्या १५ मिनिटांच्या अंतरावर हा प्रकल्प पुढील तीन वर्षांत उभारला जात आहे. त्यामुळे करंजाडे आणि पुष्पकनोड परिसराचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या भागासह नवी मुंबईलाच 'शैक्षणिक शहर' अशी ओळख मिळण्याची शक्यता आहे.

सिडकोने मागील वर्षी मुंबईत झालेल्या भव्य कार्यक्रमात ॲबर्डीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी आणि इन्स्टिट्यूटो युरोपिओ दी डिझाईन या पाच विद्यापीठांना इरादापत्रे दिली आहेत. प्रत्येक विद्यापीठाला सुमारे १० एकर जागा देण्यात येणार असून सिडकोकडून रस्ते व इतर पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. भविष्यात देशातील मोठे गुंतवणूकदार या प्रकल्पात सहभागी होण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी सुमारे १५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

दरम्यान, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यानंतर त्याच्या परिसरात महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यावर राज्य सरकारचा अधिक भर आहे. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना एज्युसिटी, मेडिसिटी व इंटिग्रेटेड लॉजिस्टिक पार्क या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी जागा मोकळी करण्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या सूचना आहेत.

# बारावीच्या परीक्षेत रायगडातील विद्यार्थ्यांचे यश

## नागोठणे उर्दू ज्युनिअर कॉलेजचा निकाल ७०.८३ टक्के

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे एज्युकेशन सोसायटी, नागोठणे संचलित उर्दू हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, नागोठणे यांनी यंदाही उत्तम निकालाची परंपरा कायम राखली आहे. रोहा तालुक्यातील उर्दू माध्यमाचे एकमेव ज्युनिअर कॉलेज म्हणून नागोठणे येथील या संस्थेची विशेष ओळख आहे.

उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ चा निकाल २ मे २०२६ रोजी जाहीर झाला. यामध्ये कला शाखेचा निकाल ७५ टक्के लागला. कला शाखेत एकूण ४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कुमारी पिंजारी अंजमा साबीर हिने ५२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कुमारी सिपाई मुस्कान नझीर हिने ४५ टक्के गुणांसह द्वितीय, तर कुमार मुजावर अबुबकर बालब याने ४२ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच वाणिज्य शाखेचा निकाल ७० टक्के लागला. या शाखेत एकूण २० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कुमारी मुल्ला नेहा नदीम हिने ६५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. कुमारी शेख सनीला इसहाक हिने ५८.६७ टक्के गुणांसह द्वितीय, तर अन्सारी इफ्रा परवीन हरून हिने ५५.१७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. अशा प्रकारे कॉलेजचा एकूण निकाल ७०.८३ टक्के लागला आहे.

कॉलेजचा उल्लेखनीय निकाल लागल्याबद्दल संस्थेचे चेअरमन समदशेठ अधिकारी, जनरल सेक्रेटरी लियाकतशेठ कडवेकर, व्यवस्थापकीय संचालक सगीर अधिकारी, शब्बीर पानसरे, डॉ. सादिया दफेदार, तसेच शाळेचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्रीवर्धनमध्ये र.ना. राऊत कनिष्ठ महाविद्यालयाची चमकदार कामगिरी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील नामवंत ना. राऊत कनिष्ठ महाविद्यालय मध्ये इयत्ता बारावी (फेब्रुवारी २०२६) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवली आहे. कला व वाणिज्य या दोन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्तम निकाल नोंदवत महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेला साजेसा मान मिळवून दिला.

कला शाखा एकूण विद्यार्थी : ३७, उत्तीर्ण : ३३ उत्तीर्ण टक्केवारी : ८९.१९% वाणिज्य शाखा एकूण विद्यार्थी : ९६, उत्तीर्ण : ९१ उत्तीर्ण टक्केवारी : ९४.७९%, दोन्ही शाखांतील एकत्रित कामगिरी पाहता, महाविद्यालयाने सातत्यपूर्ण गुणवत्तेचा मानदंड राखला असल्याचे स्पष्ट होते.

शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांवर घेतलेले परिश्रम आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे ना. राऊत कनिष्ठ महाविद्यालय हे संस्थान श्रीवर्धन तालुक्यातील अग्रगण्य व विश्वासार्ह महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. प्रत्येक वर्षी उत्कृष्ट निकाल देत विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे या निकालातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

या यशामागे शिक्षकांची मेहनत, विद्यार्थ्यांची चिकाटी आणि पालकांचे पाठबळ हे महत्त्वाचे घटक ठरले. नियमित अभ्यास, मार्गदर्शन सत्रे आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरणामुळे विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले.

## माणगावच्या निकम इंग्लिश स्कूलचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या मार्च २०२६ च्या बारावी (H.S.C.) निकालात माणगाव येथील 'एस. एस. निकम इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज'ने घवघवीत यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के लागून शाळेने आपली उच्च शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. यशाचा आलेख यावर्षी विज्ञान शाखेतील एकूण ४० विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी सर्व ४० विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत.

**निकालाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे**

विशेष श्रेणी (Distinction): ०२ विद्यार्थी, प्रथम श्रेणी (First Class): १८ विद्यार्थी, द्वितीय श्रेणी (Second Class): २० विद्यार्थी, गुणवंत विद्यार्थ्यांची कामगिरी, शाळेत रादे मंथन अरुण याने ८५.८३% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

**अव्वल पाच विद्यार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे**

१.फरादे मंथन अरुण – ८५.८३%,२. सांगे इमाद फरिद अहमद – ७७.००%,३. खान इफ़्रा निजार – ७४.६७%, ४. गवळी श्रावणी प्रफुल्ला – ७४.३३%, ५. सांगे अरिबा अब्दुल बासित – ७३.३३%

**विषयनिहाय टॉपर**

विविध विषयांत विद्यार्थ्यांनी मिळवलेले सर्वाधिक गुण: I.T.: बंदरकर जोहरा मुश्ताक (९७), गणित: सांगे अरिबा अब्दुल बासित (९३), भूगोल: फरादे मंथन अरुण (९३), जीवशास्त्र: मापरकर अझरा दाऊद (९१)

दैदीप्यमान यशाबद्दल माणगाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. एम. एस. निकम, शाळेच्या प्राचार्य डॉ. संगीता कोकाटे, सर्व ट्रस्टी, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, शिक्षकांचे अथक परिश्रम आणि पालकांचे सहकार्य या त्रिसूत्रीमुळेच हे यश साध्य झाले आहे.

## रोहा जामे मस्जिद अध्यक्षपदी रियाज शेटेंची बिनविरोध निवड

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील तबलीग जमातीचा केंद्र असलेल्या शहरातील जामे मस्जिद रोहा खालचा मोहल्ला या संस्थेच्या त्रेवार्षिक निवडणुका नुकताच पार पडल्या. या निवडणुकीत सर्वाधिक मते मिळवून निवडून आलेले रेवा संस्थेचे अध्यक्ष रियाज शेटे यांची अध्यक्षपदी तर माजी नगरसेवक जुबेर चोगले यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

रोहा जामे मस्जिद या रजिस्टर वक्फ संस्थेच्या सदस्यपदाच्या ११ जागांसाठी नुकत्यात निवडणुका पार पडल्या. पुढील तीन वर्षांसाठी संस्थेच्या सदस्यपदावर निवडून आलेल्या ११ सदस्यांची गुरुवारी रात्री १० वा.माजी समाज अध्यक्ष जाफर येरुणकर, मावळते अध्यक्ष हाफिज एजाज किरकिरे व मावळते सचिव अनिस मोरबेकर यांच्या प्रमुख उपस्थित विशेष बैठक पार पडली. यावेळी अध्यक्षपदासाठी रियाज शेटे यांचे नाव सुचविण्यात आले. त्यांच्या नावाला उपस्थित सर्व सदस्यांनी अनुमोदन दिल्यानंतर रियाज शेटे यांची समाज अध्यक्षपदी बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या उपाध्यक्षपदी जुबेर चोगले, सचिवपदी फारूक बडे, खजिनदारपदी वसीम सावरटकर तर कार्यकारी मंडळ सदस्यपदी सलीम चोगले, अ.जलील तुपके, डॉ.फरिद चिमावकर, समीर दाखवे, बिलाल मोरबेकर व नसीम महाडकर यांची निवड करण्यात आली.निवडणुन आलेल्या सर्वपदाधिकारी व सदस्यांचे निवड समितीने व ग्रामस्थांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुरूड एकात्मिक बाल विकास व अंगणवाडी सेविकांमार्फत शुभांगी कोतवाल यांना सेवानिरोप

**मुरुड : प्रतिनिधी**

एकात्मिक बाल विकास मुरुड कार्यालयातील पर्यवेक्षिका शुभांगी शाम कोतवाल या ३० वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत झाल्या आहेत. त्यांचा निरोप समारंभ दरबार हॉल येथे सपन्न झाला. मुरुड तालुक्यातील शेकडोच्या संखेने अंगणवाडी सेविका व मदतीस यांनी या कार्यक्रमासाठी मोठी गर्दी केली होती.



शुभांगी कोतवाल यांनी १४ वर्ष अंगणवाडी सेविका व तद्नंतर पदोन्नती मिळाल्यावर १६ वर्ष त्यांनी पर्यवेक्षिका या पदावर उत्कृष्ट काम केले होते. मुरुड मधील बाल विकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे , मुरुड पंचायत समिती सदस्य गणेश नाकती, माजी सरपंच मनीष नांदगावकर, शाम कोतवाल, इंदिरा ठाकूर, विजयता खेऊर, संगीता पाटील, कांचन शिंदे, अरुणा भाटकर, सोनाली ठाकूर आदी मान्यवर यांच्या शुभ हस्ते शुभांगी कोतवाल यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व मोठी फोटो फ्रेम देऊन त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

यावेळी अनेक अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी कोतवाल मॅडम यांच्या गोड आठवणी सांगताना सर्व महिलांचे मन भरून येऊन डोळ्यात अश्रू आले होते.यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे यांनी कोतवाल मॅडम यांचे काम चोख व वेळेत पूर्ण असावयाचे त्यांच्या कामामुळे मुरुड तालुका रायगड जिल्ह्यात नेहमीच अग्रेसर राहिला आहे.महिला व बालविकास साठी त्यांचे कार्य नेहमी आदर्शवत राहून त्याची आठवण सदैव या विभागात राहील असे प्रतिपादन केले.माजी सरपंच मनीष नांदगावकर व पंचायत समिती सदस्य गणेश नाकती यांनी सुद्धा मार्गदर्शन भाषण केले.आपल्या सत्काराला उत्तर देताना पर्यवेक्षिका शुभांगी कोतवाल यांनी सांगितले की,मला माझ्या कार्यालयाने व घरातील सर्व व्यक्तींनी मदत केल्याने मी माझे कार्य उत्तमपने पार पाडू शकले. माझ्या सहवासात आलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मी नेहमीच प्रेमाने वागणूक दिली व त्यांनी सुद्धा उत्तम काम केले.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग 'मिसिंग लिंक' विकासाला वेग देणारा आधुनिक महामार्ग





वेग, सुरक्षितता आणि आधुनिक अभियांत्रिकीचा संगम मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा महाराष्ट्राच्या प्रगतीचा कणा मानला जातो. राज्यातील औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींना गती देणारा हा मार्ग आता 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे नव्या उंचीवर पोहचत आहे. केवळ वाहतूक सुलभ करण्यापुरता मर्यादित न राहता, हा प्रकल्प राज्याच्या व्यापक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. राज्यातील सर्वाधिक वर्दळीचा हा महामार्ग दररोज हजारो वाहनांची वाहतूक सांभाळतो. मात्र, बोरघाट परिसरातील तीव्र वळणे, चढ-उतार, पावसाळ्यातील दरडी कोसळण्याचे प्रकार आणि त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी ही वर्षानुवर्षे मोठी समस्या राहिली. या अडचणींवर कायमस्वरूपी उपाय म्हणून 'मिसिंग लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली आणि २९ ऑगस्ट २०१८ रोजी या महत्त्वाकांक्षी योजनेला शासनाची मंजुरी मिळाली. सुमारे ६६९५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प भौतिकदृष्ट्या पूर्ण झाला व त्याचे महाराष्ट्र दिनी लोकार्पण झाले.

आडोशी बोगदा ते खंडाळा एक्झिट हा मार्ग सध्या सहा पदरी असला तरी येथे दहा पदरी वाहतूक एकत्र येते. घाटातील अवघड भौगोलिक परिस्थितीमुळे अनेकदा वाहतुकीचा वेग मंदावतो. विशेषतः पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढतो आणि काही लेन बंद कराव्या लागतात. यामुळे वेळेचा अपव्यय, अपघातांची शक्यता आणि आर्थिक नुकसान वाढते. या पार्श्वभूमीवर 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा एक पर्यायी, अधिक सुरक्षित आणि सरळ मार्ग म्हणून उभारण्यात आला आहे.

**प्रकल्पाचे स्वरूप : अंतर कमी, वेळ वाचणार**

या प्रकल्पाअंतर्गत खोपोली ते कुसगाव दरम्यान नवीन सरळ मार्ग तयार करण्यात आला आहे. एकूण १९.८४ कि.मी. लांबीच्या या मार्गात ५.८६ कि.मी. अंतरावर जुन्या रस्त्याचे सहा पदरीवरून आठ पदरीकरण करण्यात आले आहे, तर उर्वरित १३.३ कि.मी. पूर्णपणे नवीन मार्ग आहे. या नव्या मार्गामुळे प्रवासाचे अंतर सुमारे ६ किमीने कमी होणार असून, २० ते ३० मिनिटांचा वेळ वाचणार आहे. यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक जलद आणि सुलभ होणार आहे.

**अभियांत्रिकीचा अद्भुत नमुना**

गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वात रुंद बोगदा म्हणून नोंद मिसिंग लिंकमुळे भारतातील पहिला एक्स्प्रेस-वे आता अधिक वेगवान आणि सुरक्षित होत आहे. मिसिंग लिंकसह वेळ आणि इंधन वाचविणारा सुरक्षित आणि वेगवान प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. मिसिंग लिंक जगातील सर्वात रुंद बोगदा (२३.५ मीटर) असून लोणावळा तलावाच्या १८० मीटर खालून खोदलेला बोगदा आहे. या ठिकाणी ६५० मीटर केबल-स्टेड ब्रिजसह भारतातील सर्वात उंच सत्यावरील पूल पायलॉन उंची (१८२मीटर) असून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वांत रुंद बोगदा म्हणून नोंद झालेली आहे. हा 'मिसिंग लिंक' प्रकल्प मुंबईपुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि प्रवासाचा कालावधी लक्षणीयरित्या घटवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठी सुधारणा होणार आहे. मिसिंग लिंक' प्रकल्प हा आधुनिक अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो.

या प्रकल्पात दोन समांतर बोगदे (१.६४ कि.मी. आणि ८.९२ कि.मी.), भव्य व्हायाडक्ट, यांचा समावेश असून, वाहनांचा वेग १२० कि.मी. / तास ठेवण्याची सुविधा या मार्गावर उपलब्ध आहे.

**सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान**

या प्रकल्पात प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. बोगद्यांमध्ये वॉटर मिस्ट अग्निशमन प्रणाली, स्कॅडा आधारित नियंत्रण, एएनपीआर कॅमेरे, व्हाइस इव्हॅक्यूएशन सिस्टिम, आधुनिक वायुवीजन व्यवस्था आणि एसओएस सुविधा बसवण्यात आल्या आहेत. या सर्व प्रणालींमुळे अपघात किंवा आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देणे शक्य होणार आहे.

**मिसिंग लिंकची व्यापक उपयुक्तता**

'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे अनेक महत्त्वपूर्ण लाभ अपेक्षित आहेत.

प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी कमी होणार असून, घाटातील धोकादायक वळणे टाळल्याने अपघातांचे प्रमाण घटेल. वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक सुरळीत होईल. इंधनाच्या वापरात घट होऊन दररोज सुमारे १ कोटी रुपयांची बचत होईल, अशी अपेक्षा आहे. एकूणच, हा प्रकल्प प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि किफायतशीर बनवणार आहे.

**कठीण परिस्थितीतही यश**

या प्रकल्पाच्या अंमलबजावणीत अनेक तांत्रिक आणि नैसर्गिक आव्हानांचा सामना करावा लागला. डोंगराळ भागात बोगदे खोदणे, घनदाट वनक्षेत्रात काम करणे, मुसळधार पावसामुळे होणारे अडथळे, तसेच बोगद्यांमध्ये ऑक्सिजन पुरवठा आणि सुरक्षा व्यवस्थापन ही मोठी आव्हाने होती. याशिवाय कोविड-१९ महामारीमुळे आणि काही तांत्रिक चाचण्यांसाठी परदेशी संस्थांवर अवलंबून राहावे लागले मात्र या सर्व अडचणींवर मात करत प्रकल्प यशयशस्वीरित्या पूर्ण करण्यात आला.

**विकासाच्या दिशेने मोठे पाऊल**

मुंबईपुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ एक रस्ता नाही, तर आधुनिक तंत्रज्ञान, नियोजन आणि दृष्टीकोन यांचा संगम आहे. या प्रकल्पामुळे केवळ प्रवास सुलभ होणार नाही, तर राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासालाही मोठी चालना मिळणार आहे.

भविष्यात हा प्रकल्प महाराष्ट्राच्या पायाभूत सुविधांच्या प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. महामार्ग हे कोणत्याही राज्याच्या अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे असतात. मुंबई आणि पुणे ही दोन प्रमुख आर्थिक केंद्रे जोडणारा हा मार्ग उद्योग, आयटी, उत्पादन क्षेत्र आणि सेवा क्षेत्रासाठी जीवनदायिनी भूमिका बजावतो. 'मिसिंग लिंक' प्रकल्पामुळे या दोन शहरांमधील प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम होणार असल्याने व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळणार आहे.

**दळणवळण सुविधांचा विस्तार**

या प्रकल्पामुळे केवळ दोन शहरांमधील अंतर कमी होत नाही, तर संपूर्ण प्रदेशातील दळणवळण सुविधांचा दर्जा उंचावतो.

खोपोली, लोणावळा, कुसगाव यांसारख्या परिसरांना अधिक चांगली जोडणी मिळणार आहे. त्यामुळे ग्रामीण आणि अर्धशहरी भागांपर्यंतही विकासाच्या संधी पोहोचतील. आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या सुविधा अधिक सहज उपलब्ध होतील.

**पर्यटन आणि स्थानिक अर्थव्यवस्था**

मुंबईपुणे मार्ग हा पर्यटनासाठीही अत्यंत महत्त्वाचा आहे. लोणावळा, खंडाळा यांसारख्या पर्यटनस्थळांना या मार्गामुळे अधिक वेगाने पोहोचता येईल. परिणामी पर्यटन वाढून स्थानिक व्यवसाय, हॉटेल उद्योग आणि सेवा क्षेत्राला चालना मिळेल. स्थानिक रोजगारनिर्मितीतही वाढ होईल.

**शाश्वत आणि संतुलित विकास**

वाहतुकीचा प्रवाह सुरळीत झाल्यामुळे वाहनांची गर्दी कमी होईल आणि इंधनाचा वापरही घटेल.

यामुळे पर्यावरणावर होणारा ताण कमी होण्यास मदत होईल. नियोजनबद्ध पायाभूत सुविधा विकासामुळे हा प्रकल्प शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरतो. मुंबईपुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा केवळ प्रवास सुलभ करणारा रस्ता नसून, राज्याच्या सर्वांगीण विकासाला गती देणारा महामार्ग आहे. आर्थिक वाढ, दळणवळण सुधारणा, सुरक्षितता आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन या सर्व बाबींचा समतोल साधत हा प्रकल्प महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा अध्याय लिहिणार आहे.

**– वंदना थोरात,**
**वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय**



**रोहा : शहरातील दमखाडी येथील साईबाबा मंदिरात दर्शन घेताना रोहा अष्टमी नगर परिषदेचे गटनेते महेंद्र गुजर, सभापती महेश कोलाटकर, महेंद्र दिवेकर, माजी उपनगराध्यक्ष सुभाष राजे, समाधान शिंदे, जालिंदर शेवाळे आदी.**

## खालापूर तहसील कार्यालयात महाराष्ट्रदिनी ध्वजवंदन

**चौक :** महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस खालापूर तहसील कार्यालयात तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला.

१ मे १९६० रोजी 'मुंबई पुनर्रचना कायद्यानुसार मराठी भाषिक महाराष्ट्र राज्य स्वतंत्र अस्तित्वात आले, त्या दिवसाच्या आठवणीने दरवर्षी १ मे रोजी महाराष्ट्र दिन साजरा केला जातो. १०६ हुतात्म्यांच्या बलिदानानंतर संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न पूर्ण झाले. हा दिवस राज्याचा स्थापना दिवस साजरा होतो. तहसीलदार अभय चव्हाण यांनी उपस्थित नागरिक, लोकप्रतिनिधी,अधिकारी, कर्मचारी यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार, नायब तहसीलदार सुधाकर राठोड,माजी नगराध्यक्ष डॉ.सुनील पाटील, नगरसेवक राहुल गायकवाड, जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, अॅड. राजेंद्र येरूनकर, माजी उपसभापती उमेश गावंड, नागरिक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



**माणगाव : महाराष्ट्र दिनाच्या ६७व्या वर्धापन दिनानिमित्त नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

# दिल्लीचा राजस्थानवर 'रॉयल' विजय

**जयपूर : वृत्तसंस्था**

जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळवण्यात आलेल्या सामन्यात केएल राहुल आणि पथुम निसंका यांच्या हिट शोच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने आयपीएलमधील आल्या सर्वोच्च धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करत सात विकेट्सनी विक्रमी विजय नोंदवला. दुसऱ्या बाजूला वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल ही धडाकेबाज जोडी फ्लॉप ठरली.



पहिल्यांदा फलंदाजीसाठी उतरलेल्या राजस्थान रॉयल्सच्या सलामी जोडीवर पुन्हा एकदा सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या, पण यंदाच्या हंगामातील पहिला सामना खेळणाऱ्या मिचेल स्टार्कने पहिल्या षटकातच यशस्वी जैस्वाल याला ६ धावांवर तंबूता रस्ता दाखवला. दुसऱ्या षटकात कायले जेमिसन याने वैभव सूर्यवंशीची खेळीला चार धावांवर ब्रेक लावलण्यात यश मिळवले.

राजस्थान संघ अडचणीत सापडल्यावर ध्रुव जुरेल आणि कर्णधार रियान पराग जोडी जमली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ५९ चेंडूत १०२ धावांची भागीदारी रचली. ध्रुव ३० चेंडूत ४२ धावा करून परतल्यावर रियान पराग नव्वदीच्या घरात पोहचल्यावर बाद झाला. त्याने ५० चेंडूत ९० धावांची खेळी केली. अखेरच्या षटकात डोनोव्हन फरेरा याने आणखी एक धमाकेदार खेळीचा नजराणा पेश करताना अवघ्या १४ चेंडूत दोन चौकार आणि सहा षटकारांच्या मदतीने ४७ धावांची नाबाद खेळी केली. तिघांच्या दमदार खेळीच्या जोरावर राजस्थान रॉयल्सच्या संघाने निर्धारित २० षटकात ६ बाद २२५ धावा करत दिल्ली कॅपिटल्ससमोर २२६ धावांचे टार्गेट सेट केले होते. दिल्लीकडून मिचेल स्टार्कने दुखापतीतून सावरुन जबरदसत कमबॅक करताना घेतलेल्या तीन विकेट्सशिवाय कायले जेमिसन, अक्षर पटेल आणि टी-नटराजन यांनी प्रत्येकी एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने आयपीएलच्या इतिहासात एवढी मोठी धावसंख्या कधीच यशस्वीरित्या पार केली नव्हती, पण पथुम निसंकाने पुन्हा मिळालेल्या संधीच सोने करताना ३३ चेंडूत सहा चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ६२ धावांची दमदार खेळी साकरली. लोकेश राहुलने पुन्हा आपल्या फलंदाजीतील क्लास दाखवत ४० चेंडूत सहा चौकार आणि पाच षटकाराच्या मदतीने ७५ धावांची खेळी करत संघाला दमदार सुरुवात करून दिली. नितीश राणाने केलेल्या १७ चेंडूतील ३३ धावांच्या उपयुक्त खेळीनंतर ट्रिस्टन स्टब्स १८ (११) आणि आशुथोष शर्मा २५ (१५) जोडीने अखेरच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर दिल्ली कॅपिटल्सचा विजय निश्चित केला. राजस्थानकडून गोलंदाजीत जोफ्रा आर्चर, तुषार देशपांडे आणि रवींद्र जडेजा यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

## दिल्लीच्या ऐतिहासिक विजयानंतर गुणतालिकेत मोठा फेरबदल

**मुंबई : प्रतिनिधी**

जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर पार पडलेल्या आयपीएल सामन्यात दिल्ली कॅपिटल्सचा समान सामना राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध पार पडला. या सामन्यात दिल्लीचा संघ विक्रमी २२६ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. हे आव्हान दिल्लीने सहज पूर्ण केले आणि ऐतिहासिक विजयाची नोंद केली. दरम्यान, या विजयानंतर गुणतालिकेत मोठा फेरबदल झाला आहे.

दिल्ली कॅपिटल्सला स्पर्धेतील आव्हान टिकवून ठेवण्यासाठी विजय मिळवणं गरजेचं होतं. जेव्हा संघाला सर्वात जास्त गरज होती. त्यापुढे केएल राहुल आणि पथूम निसांका या अनुभवी फलंदाजांच्या जोडीने पुढाकार घेतला. या विजयासह दिल्लीचा संघ गुणतालिकेत सहाव्या स्थानी पोहचला आहे. दिल्लीने आतापर्यंत नऊपैकी चार सामने जिंकले आहे, तर पाच सामन्यांमध्ये पराभवाचा सामना करावा लागला आहे. पंजाब किंग्ज, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स हे चार संघ 'टॉप ४'मध्ये आहेत, तर शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणारा गुजरात टायटन्सचा संघ गुणतालिकेत पाचव्या स्थानी आहे.

राजस्थान रॉयल्सने या सामन्यातील पहिल्या डावात धावसंख्या उभारली होती, पण ही धावसंख्या सामना जिंकण्यासाठी पुरेशी नव्हती. दिल्ली कॅपिटल्सने सात गडी राखून आव्हान पूर्ण केलं. त्यामुळे राजस्थान रॉयल्सला हा सामना गमवावा लागला, पण पराभव होऊनही राजस्थान रॉयल्सचा संघ टॉप ४मध्ये कायम आहे.

राजस्थान रॉयल्सचा हा १० सामन्यापैकी चौथा पराभव आहे. सहा गुणांसह त्यांनी आतापर्यंत १२ गुणांची कमाई केली आहे. राजस्थानने जर हा सामना जिंकला असता, तर गुणतालिकेत वर जाण्याची संधी होती, पण त्यांना आता १२ गुणांवर समाधान मानावे लागले आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबादचेदेखील प्रत्येकी १२-१२ गुण आहेत. त्यामुळे चुरस वाढल्याचे दिसून येते.

## आक्रमक सेलिब्रेशन करणाऱ्या जेमिसनला बीसीसीआयची सक्त ताकीद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये शुक्रवारी रात्री झालेल्या लढतीत दिल्ली कॅपिटल्सने जबरदस्त फॉर्ममध्ये असलेल्या राजस्थान रॉयल्सवर आरामात विजय मिळवला. दरम्यान, या लढतीत वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जयस्वाल हे राजस्थानचे विस्फोटक सलामीवीर झटपट बाद झाले होते. त्यापैकी वैभव सूर्यवंशीला बाद केल्यानंतर दिल्लीचा गोलंदाज कायल जेमिसन यांने जोरदार आणि आक्रमक अविर्भावात सेलिब्रेशन केले होते, मात्र या कृतीमुळे आता जेमिसन अडचणीत सापडला असून बीसीसीआयने त्याता सक्त ताकीद देत त्याच्यावर कारवाई केली आहे.



या लढतीत राजस्थानच्या डावाला सुरुवात झाल्यावर काइल जेमिसनने विस्फोटक अंदाजात खेळणाऱ्या वैभव सूर्यवंशील केवळ १४ धावांवर त्रिफळाचीत केले होते. त्यानंतर जेमिसनने वैभवसमोर जात आक्रमकपणे सेलीब्रेशन केले. जेमिसनची ही कृती वैभवला भडकवणारी होती. दरम्यान, जेमिनसने केलेल्या या कृतीची बीसीसीआयने गंभीर दखल घेतली आहे तसेच त्याने केलेल्या या कृत्यामुळे आयपीएलमधील कोड ऑफ कंडक्टच्या कलम २.५चे उल्लंघन झाले असल्याचा ठपका ठेवत सामनाधिकाऱ्यांनी त्याला एक डिमेरिट पॉईंट दिला आहे तसेच त्याला असे कृत्य न करण्याबाबत सक्त ताकीद देण्यात आली आहे.

**असा आहे नियम**

आयपीएलच्या कोड ऑफ कंडक्टमधील कलम २.५ हे मैदानावर वादविवाद होऊ शकतात अशी भाषा आणि कृती करण्यावर मर्यादा आणते. दरम्यान, जेमिसनच्या या कृतीमुळे या नियमाचा भंग झाल्याचे सांगत सामनाधिकारी राजीव सेठी यांनी त्याला शिक्षा सुनावली आहे. जेमिसननेही आपली चूक मान्य केली असून दिलेल्या शिक्षेचा स्वीकार केला आहे.

## अक्षर पटेलकडून 'त्या' चाहत्यांना विजय समर्पित

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



दिल्ली कॅपिटल्सने राजस्थान रॉयल्सविरुद्धचा सामना जिंकून आतपर्यंतचा सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग केला. हा ऐतिहासिक विजय दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने अपघातात मरण पावलेल्या क्रिकेट चाहत्यांना समर्पित केला आहे.

दिल्ली कॅपिटल्स संघाचा याआधीचा सामना पाहण्यासाठी आलेल्या चाहत्यांपैकी दोन जणांचा सामना पाहून घरी जात असताना अपघात झाला. या अपघातात दोघांनाही आपले प्राण गमवावे लागले. सामना झाल्यानंतर बोलताना अक्षर पटेल म्हणाला, गेल्या सामन्यानंतर आमच्या चाहत्यांसोबत जी दुःखद घटना घडली, त्याबद्दल मला इतकंच सांगायचं आहे की, आम्ही तुमच्या दुःखात सहभागी आहोत. हा विजय आम्ही त्यांना समर्पित करतो. आमच्या दिल्ली कॅपिटल्स कुटुंबाशी जोडलेले दोन सदस्य आम्ही गमावले आहेत.

## शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीचा मालवणमध्ये दणदणीत मालिका विजय

### सावंतवाडीवर २-१ने मात

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

मालवण येथील सौ. लक्ष्मीबाई नारायण साटम स्टेडियमवर नुकताच झालेल्या शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमी, गव्हाण (ता. पनवेल) विरुद्ध सावंतवाडी क्रिकेट संघांमधील रोमांचक क्रिकेट मालिकेत शिवाजीनगर संघाने २-१ अशा फरकाने विजयी पताका फडकावली. यावेळी नवोदित आणि अनुभवी खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करत प्रेक्षकांची मने जिंकली.



सातत्यपूर्ण आणि संतुलित कामगिरीच्या जोरावर शिवाजीनगर अकॅडमीने मालिकेत बाजी मारली. शेवटच्या व निर्णायक सामन्यात शिवाजीनगर संघाने प्रथम फलंदाजी करत ४० षटकांत २६७ धावांचा भक्कम डोंगर उभा केला. त्यानंतर सावंतवाडी संघाला १८० धावांवर रोखत शानदार विजय नोंदवला.

या मालिकेत शिवाजीनगर अकॅडमीचा कर्णराज देशमुख आणि अधिराज पाटील यांनी अष्टपैलू कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. याशिवाय पीयूष पाटील, हर्ष ठाकूर, किमिया कदम, जिज्ञासा कडू, शोयब शेख, जिज्ञेश मोकल, चैतन्य पाटील, रूहान मढवी, नक्ष सक्सेना, आयुष मोकल, पार्थ तांडेल, आणि इतर खेळाडूंनीही उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे शिवाजीनगर अकॅडमीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून पुढील स्पर्धांसाठी संघाचा आत्मविश्वास उंचावला आहे.

या दणदणीत विजयाबद्दल शिवाजीनगर अकॅडमीचे अध्यक्ष अमित कडू यांनी सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि समर्थकांचे आभार मानले. "संघाने दाखवलेली जिद्द आणि एकजूट हीच या यशामागची खरी ताकद आहे," असे त्यांनी नमूद केले तसेच प्रशिक्षक राजेश पाटील यांनी खेळाडूंच्या कामगिरीबद्दल समाधान व्यक्त करत, "खेळाडूंनी शिस्त, मेहनत आणि संघभावना यांचे उत्तम उदाहरण दाखवले. ही कामगिरी पुढील स्पर्धांसाठी प्रेरणादायी ठरेल," असे सांगितले.

### अखिल भारतीय पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धा


## युवा पलटन, युनियन बँक, भारतीय नौदल, युपी योद्धा संघ उपांत्य फेरीत

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील युवा पलटन (इंशोअरकोट प्रा. लि.), युनियन बँक यांच्याबरोबर भारतीय नौदल, युपी योद्धा यांनी बंड्या मारूती सेवा मंडळाने आयोजित केलेल्या अखिल भारतीय पुरुष व्यवसायिक कबड्डी स्पर्धेची उपांत्य फेरी गाठली. बंड्या मारूती संघाने आपल्या अमृत महोत्सवी वर्ष आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

मुंबईतील ना.म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे मॅटच्या एका क्रीडांगणावर चौथ्या दिवशी झालेल्या सामन्यात भारतीय नौदलने पूर्वार्धातील १६-२३ अशा पिछाडीवरून दक्षिण मध्य रेल्वेचा प्रतिकार ४४-४३ असा परतवून लावत रसिकांना आश्चर्याचा धक्का दिला. सुरुवातीला दोन गुण घेत नौदलाने सुरुवात झोकात केली, पण पहिला लोण देत रेल्वेने डाव पलटवीत आघाडी घेतली. शेवटची तीन मिनिटे असेपर्यंत ४१-३५ अशी आघाडी टिकविण्यात रेल्वेला यश आले होते, पण शेवटच्या क्षणी दुसरा लोण देत नौदलाने आपली पिछाडी ४०-४१ अशी कमी केली. त्यानंतर भरतने चढईत गुण घेत बरोबरी साधली व दुसऱ्या चढाईत दोन गुण घेत आघाडी घेतली. रेल्वेला शेवटच्या चढईत सुरजितने एक गुण त्यांना बहाल करीत संघाचा विजय साजरा केला. भरत खत्रीने चढईत १७ गुण घेत, तर सुरजितने पाच पकडी करीत या विजयात सिंहाचा वाटा उचलला. त्यांना रोहित टोमरने चढाईत पाच गुण, तर रिंकूने तीन पकडी करीत उत्तम साथ दिली.

युवा पलटन (इंशोअरकोट प्रा. लि.)ने पहिल्या डावातील १८-२३ अशा पिछाडीवरून जयपूर पिंक क्लबचे आव्हान ४३-४१ असे मोडून काढले. पहिला लोण देत जयपूरने सुरुवात शानदार केली. विश्रांतीनंतर आणखी एक लोण देत युवाच्या गोटात खळबळ निर्माण केली. याने निराश झालेल्या रसिकांनी युवा पराभूत झाले म्हणून मैदान सोडले,



पण युवाच्या नीरज मिसाळचा इरादा काही वेगळाच होता. त्याने आपल्या प्रत्येक चढईत गुण घेत शेवटच्या १० मिनिटांत जयपूर संघावर दोन लोण देत सामन्याची उत्कंठा शिगेला पोहचविली. त्याला पूर्ण सामन्यात फेल गेलेल्या किशोर जाटने मोक्याच्या क्षणी दोन गुण घेत संघाच्या विजयात हातभार लावला. नीरजने चढाईत १७ गुण घेत, तर वैभव रबाडेने नऊ पकडी घेत या विजयात सिंहाचा वाटा उचलला. युवाच्या या विजयात खेळाडूंच्या बरोबरीने प्रशिक्षक संग्राम मांजरेकर यांच्यादेखील कल्पक मार्गदर्शनाची जोड लाभली.

युनियन बँकेनेही पहिल्या डावातील २५-२९ अशा पिछाडीवरून ओएनजीसीचा प्रतिकार ५८-४२ असा सहज हाणून पाडला. विश्रांतीनंतर टॉप गिअर टाकत तीन लोण देत आपला विजय साकारला. या विजयाचा शिल्पकार ठरला तो सुशील, सोमवीर मेहरा, अतुल जाधव व सचिन. सुशिलने चढईत २५ व सोमवीरने १० गुण घेत, तर अतुल जाधव, सचिन यांनी प्रत्येकी सहा पकडी केल्या. ओएनजीसीचा खेळ विश्रांतीनंतर ढेपळला. या डावात त्यांनी अवघे १३ गुण मिळविले. त्यातील आठ गुण हे बोनस होते. त्याउलट बँकेने तीन लोण देत ३३ गुण वसुल केले. यामुळेच त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

शेवटच्या सामन्यात युपी योद्धाने मुंबईतील बलाढ्य अशा भारत पेट्रोलियमवर ५४-३६ अशी सहज मात केली. मध्यंतरला २७-१८ अशी युपीकडे आघाडी होती.




## कृणाल पांड्याला गोलंदाजी का नाही दिली? भुवीचे अजब कारण

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सकडून चार गडी राखून पराभव पत्करावा लागला. या पराभवादरम्यान एक आश्चर्यकारक घडामोड घडली.



बंगळुरूने सामन्यात केवळ चार गोलंदाजांचा वापर केला. विशेष म्हणजे फॉर्मात असलेल्या कृणाल पांड्याला एकही षटक टाकण्यास दिले नाही. वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारने कृणाल पांड्याला गोलंदाजी न देण्यामागील कारण स्पष्ट केले, पण ते कारण फारच विचित्र आणि अजब वाटले.

या सामन्यात कृणाल पांड्याला एकही षटक दिले गेले नाही. सामना संपल्यानंतर भुवनेश्वर कुमारने कृणाल पांड्याला गोलंदाजी न देण्यामागील कारण स्पष्ट केले. भुवी म्हणाला, कृणाल पांड्याला गोलंदाजी न देणे हा एक रणनीतिबद्ध निर्णय होता. तुम्ही सामना पाहिल्यास खेळपट्टी वेगवान गोलंदाजांसाठी अनुकूल होती. त्यामुळे फिरकी गोलंदाज संघात आहेत म्हणून त्यांना गोलंदाजी देणे योग्य नाही. जर फिरकी गोलंदाजीला मदत मिळत असती, तर आम्ही त्याला नक्कीच गोलंदाजी दिली असती.

कृणाल पांड्याला गोलंदाजी देण्यात आली नाही, कारण खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना मदत करत नव्हती, तर मग सुयश शर्माला गोलंदाजी का देण्यात आली? असा प्रश्न विचारला जात आहे. त्याला ३.५ षटके देण्यात आली आणि त्याने ४४ धावा दिल्या. सुयश हादेखील फिरकी गोलंदाज आहे. त्यामुळे त्याला षटके देण्यात आली, तर कृणाल पांड्यालाही षटक द्यायला हवे होते, असे चाहत्यांमधून बोलले जात आहे. विशेष म्हणजे, कृणालने या हंगामात नऊ सामन्यांमध्ये नऊ बळी घेतले आहेत.

## हस्तांदोलन वादावर पाक कर्णधाराचा मोठा दावा

**इस्लामाबाद : वृत्तसंस्था**

पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर राष्ट्रीय भावना लक्षात घेऊन भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव आणि त्याच्या संघाने घेतलेली भूमिका ठाम होती, मात्र आता पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगा याने या 'हँडशेक' (हस्तांदोलन) वादावर सविस्तर माहिती दिली आहे.

सोशल मीडियावर शेअर केलेल्या एका व्हिडीओमध्ये सलमान अली आगाने म्हटले आहे की, मी टॉससाठी गेलो होतो. त्यापूर्वी पत्रकार परिषद झाली. तिथे हस्तांदोलन झाले, ट्रॉफीचे शूट झाले. जेव्हा मी टॉससाठी जात होतो, तेव्हा मी अगदी सामान्य होतो. मला कल्पना होती की, परिस्थिती फारशी सामान्य नसेल, पण 'हँडशेक' (हस्तांदोलन) होणार नाही हे मला माहीत नव्हते.

"आमचे मीडिया मॅनेजर नईम भाई यांच्यासोबत मी टॉससाठी गेलो. मॅच रेफरीने मला बाजूला नेले आणि सांगितले की, 'आपण हे अशा पद्धतीने करणार आहोत. इथे हस्तांदोलन होणार नाही, कृपया याची नोंद घ्या.' मी म्हणालो, ठीक आहे. अशा प्रकारे त्यांनी मला आधीच कल्पना दिली होती, असेही आगाने म्हटले आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com